cmyk

## संपादकीय

### जनता पाण्यासाठी त्रस्त, सरकार मात्र नामानिराळे !

मार्च महिन्यातच मराठवाड्यातील धरणांमध्ये अवघा २०.५५ टक्के एवढा अत्यल्प पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे. राज्यातील सहा महसुली विभागातील स्थितीही चिंताजनक आहे. सरासरी ३९.७६ टक्के पाणीसाठा राज्यात शिल्लक आहे. यात नागपूर ५०.१७ टक्के, अमरावती ५१.१९ टक्के, नाशिक ३९.९९ टक्के, कोकण ५२.२३ टक्के तर छ. संभाजीनगर २०.५५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३४५ | गुरूवार दि.२८ मार्च २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


### आघाडी धर्माला गालबोट, जागावाटपाची चर्चा अपुरीच

मुंबई : देशात इंडिया आघाडी विस्कळीत झाली तशीच राज्यातही महाविकास आघाडी विखुरल्यात जमा आहे. उद्धव ठाकरे गटानंतर वंचितने ९ उमेदवारांची याची जाहीर केल्याने मविआतील नेते बिथरले आहेत. जागावाटपावर अंतिम निर्णय झालेला नसताना उद्धव ठाकरेंनी परस्पर यादी जाहीर करत आघाडी धर्माला गालबोट लावल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. महाविकास आघाडीत जागावाटपावरून बिनसल्याची ही नांदी आहे. एकमेकांच्या जागांवर या पक्षांनी दावे ठोकले होते.

# इथेनॉल निर्मितीवरील बंधने शिथिल करा

## साखर उद्योगांतून मागणी, साखर उत्पादनात वाढ होण्याची शक्यता

**पुणे । पतिनिधी**

**देशात अंतिम टप्प्यात साखर उत्पादन वाढत असल्याने केंद्राने इथेनॉल निर्मितीवरील बंधने शिथिल करावीत, अशी मागणी साखर उद्योगांतून होत आहे. इंडियन शुगर अँड बायो–एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (इस्मा) यंदा अंतिम टप्प्यात साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे.**

'इस्मा'ने सार्वजनिक वितरण विभागाला या बाबतचे पत्र दिले आहे. केंद्राने बी हेवी मोलॅसिस, साखर व



उसाच्या रसापासून तयार होणाऱ्या इथेनॉलला परवानगी दिली आहे. या पत्रामध्ये कोणत्या भागात किती उत्पादन होईल. या बाबत विभागाला माहिती दिली आहे. 'इस्मा'ने हंगामाच्या पूर्वी ३३० लाख टन साखर तयार होईल, असा अंदाज व्यक्त केला होता, पण हंगामाच्या शेवटी शेवटी हा अंदाज ३४० लाख टन साखरेपर्यंत अंदाज वाढविला. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये यंदा अंदाजापेक्षा अधिक उत्पादन होते ◀◀ पान २ वर

### सद्याचे उत्पादन गेल्यावर्षी एवढेच

देशातील २०८ साखर कारखाने १५ मार्च २०२३ अखेर बंद झाले होते. यंदा या कालावधीत १६२ साखर कारखाने बंद झाले आहेत. यंदा या कालावधीत २८० लाख टन साखर तयार झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत २८२ लाख टन साखर निर्मिती झाली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत केवळ २ लाख टन साखर कमी तयार झाली आहे. महाराष्ट्रात गेल्या वर्षीच्या बरोबरीने साखर उत्पादन सुरू आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर उत्पादनात जवळ जवळ सारखी परिस्थिती आहे.

## मंत्री सत्तारांच्या चौकशीचे हायकोर्टाकडून आदेश

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



**दोन महिन्यांपूर्वी सत्तार यांच्या विरोधात एकाच वेळी पाच फौजदारी तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. कृषी प्रदर्शन भरवण्यासाठी जमिनी सपाटीकरण करून त्यावर अवैधरीत्या ताबा केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. याबाबत उच्च न्यायालय यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांना कॅबिनेट अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी यांची चौकशी प्रकरणात आठ आठवडे म्हणजेच दोन महिन्यांच्या आत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.**

मंत्री अब्दुल सत्तार सिल्लोड सोयगाव विधानसभेमध्ये सन २००८–१० साली आमदार असताना त्यांनी अंधारी, अंभई, सोयगाव व फर्दापूर या चार गावांमध्ये सामाजिक सभागृह बनविण्यासाठी जवळपास ४५ लाख रुपये शासकीय निधी उपलब्ध करून दिला होता. परंतु सदर निधीचा वापर सामाजिक सभागृह बनविण्यासाठी न करता, त्यांच्या ◀◀ पान २ वर

### आंबेडकरांचा दावा जरांगेंनी फेटाळला

**जालना:** प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत चर्चा झाली, पण मी अजून वंचित आघाडीला पाठिंबा दिलेला नाही. ३० मार्चपर्यंत आमचा निर्णय जाहीर करू, असे स्पष्ट करत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आंबेडकर यांनी पाठिंब्याचा केलेला दावा फेटाळला आहे.

'वंचित' ने मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत आघाडी केली असल्याचा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला होता. जरांगे पाटील यांचा आम्हाला पाठिंबा राहणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले होते. मात्र त्यांचा हा दावा जरांगे पाटील यांनी फेटाळला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे एका कार्यक्रमादरम्यान जरांगे पाटील यांनी महाराष्ट्रातील कोणत्याच उमेदवाराला अद्याप पाठिंबा दिला नसल्याचे सांगितले. मराठा समाजासोबत चर्चा करून पुढील निर्णय घेऊ. भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेणार नाही. सगळ्यांशी विचारविनीमय करून भूमिका घेऊ. सरकारने अजून मराठा आरक्षणाचा ठाम निर्णय घेतलेला नाही. मंगळवारी प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत चर्चा झाली. ३० मार्चपर्यंत समाजाचा निरोप येईल त्यानंतर निर्णय जाहीर करू, तोपर्यंत कोणताच शब्द देता येणार नाही, असे जरांगे पाटील यांनी सांगितले.

# फोडाफोडीनंतर संपेल म्हणल्याली ठाकरे, शिंदेंची सेनाच जागा मिळवण्यात अव्वल!

## देशात १० वर्ष सत्तेत असलेला भाजप राज्यात क्रमांक दोनवर; राष्ट्रवादीसह काँग्रेसला जागांमध्ये फटका

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या दिड वर्षापासून राज्यात सत्तेसाठी झालेल्या फोडाफोडीनंतर लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपात सर्वाधिक जागा मिळवण्यात ठाकरे व शिंदे यांची शिवसेना एक नंबरवर तर भाजप दोनवर आहे. काँग्रेस व शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला २०१९ इतक्याही जागा यावेळी मिळण्याची शक्यता कमी आहे.**

उध्दव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदावरुन पायउतार करण्यासाठी भाजपने मोठी खेळी करीत अगोदर शिवसेना व नंतर काही महिन्याने राष्ट्रवादी काँग्रेस फोडून राज्यात सत्तांतर केले. त्यामुळे ठाकरे यांच्यासह शिंदे







यांच्या शिवसेनेचे अस्तित्व हळूहळू कमी होईल असे मानले जात होते. मात्र लोकसभा निवडणुकीतच दोन्ही शिवसेनेला कमालीचे महत्व आले. भाजपकडून शिंदे सेनेला आडदांडा घातला जात आहे. मात्र महाविकास आघाडीत ठाकरेंची शिवसेना सुसाट आहे. ◀◀ पान २ वर

### राज्यातील लोकसभेचे संभाव्य जागावाटप

**भाजप (२५) ३०, शिवसेना (२३) शिंदे सेना १३, ठाकरे सेना १८ दोन्ही सेना मिळून ३१ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस (१९) अजितदादा राष्ट्रवादी ४, शरद पवार गट १०,दोन्ही पवारांची राष्ट्रवादी मिळून १४ जागा, काँग्रेस (२५) २०, रासप १ ( कंसातील आकडेवारी २०१९ मधील लढवलेल्या जागांची आहे )**

## ठाकरेंकडून १७ शिलेदारांची नावे जाहीर

### शरद पवारांसह काँग्रेसच्या नेत्यांकडून तीव्र नाराजी

मुंबई–महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्मुला जाहीर होण्याअगोदरच ठाकरे शिवसेनेने राज्यातील आपले १८ पैकी १७ लोकसभेचे शिलेदार जाहीर केले आहेत. त्यामुळे शरद पवारांसह काँग्रेसच्या नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

उध्दव ठाकरे यांच्या पक्षाला महाविकास आघाडीकडून १८ जागा दिल्या जाणार ◀◀ पान २ वर

### हेच ते १७ उमेदवार

**बुलढाणा**–नरेंद्र खेडेकर, **यवतमाळ** –संजय देशमुख, **हिंगोली**– नागेश पाटील आष्टीकर, **परभणी**– संजय जाधव, **संभाजीनगर**–चंद्रकांत खैरे, **नाशिक**– राजाभाई वाजे , **ठाणे**–राजन विचारे, **मुंबई** – उत्तर पश्चिम अमोल कीर्तीकर, **मुंबई ईशान्य (उत्तर पूर्व)** संजय दिना पाटील, **मुंबई दक्षिण मध्य**– अनिल देसाई,**दक्षिण मुंबई**– अरविंद सावंत , **रायगड**–अनंत गीते, **मावळ**–संजोग वाघेरे–पाटील, **शिर्डी**– भाऊसाहेब वाघचौरे, **धाराशिव**– ओमराजे निंबाळकर, **सांगली**– चंद्रहार पाटील, **रत्नागिरी–सिंधुदुर्ग**– विनायक राऊत

## पंकजा मुंडे भाजपच्या राष्ट्रीय स्टार प्रचारक

### एकनाथ शिंदे, अजित पवारांसह ४० नावे जाहीर



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**


**आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने स्टार प्रचारकांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यात अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. यात बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे या भाजपच्या राष्ट्रीय स्टार प्रचारक बनल्या आहेत. यादीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवारांसह पंकजा मुंडे यांच्या नावाचाही समावेश आहे. भाजपने ४० राष्ट्रीय स्टार प्रचारकांची नावे बुधवारी जाहीर केली.**

भाजपने आपल्या राष्ट्रीय स्टारप्रचारकांची बुधवारी नावे जाहीर केली. या यादीत बीडच्या भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचाही समावेश असून बीडसह त्या राज्यात व देशातील इतर उमेदवारांच्या प्रचारासाठी त्या जावू शकतात. या यादीत नरेंद्र मोदी, जगतप्रकाश नड्डा, राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, प्रमोद सावंत, ◀◀ पान २ वर

### सेना-भाजपच्या भांडणात राष्ट्रवादीचा लाभ

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा मतदारसंघात (२०२४) मोठा ट्विस्ट आला आहे. कारण एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांनी खासदार हेमंत गोडसे यांची उमेदवारी जाहीर केली असताना, तिकडे छगन भुजबळ हेच महायुतीचे उमेदवार असतील हे



समोर आले आहे. नाशिक लोकसभेबाबात महायुतीतील शिवसेना आणि भाजप यांच्यात चढाओढ सुरु होती. मात्र आता छगन भुजबळ यांच्या नावावर एकमत झाले आहे. नाशिकच्या जागेसाठी शिवसेना आणि भाजपमध्ये चढाओढ सुरु होती. मात्र त्यात राष्ट्रवादी काँग्रेसने बाजी मारल्याचे चित्र आहे.

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ मार्च २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ५३.०० क्विंटल | | |
| २,१५१ | ३,२६० | २,४९७ |
| ज्वारी/हायब्रिड :१४८.०० क्विंटल | | |
| १,७०० | ३,६५० | २,५१६ |
| मूग :०.५० क्विंटल | | |
| ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : १४.५० क्विंटल | | |
| ६,५०० | ९,५०० | ८,५३९ |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: १.५० क्विंटल | | |
| २,५९१ | २,७४१ | २,६६६ |
| चिंचोका/लोकल: ३.०० क्विंटल | | |
| २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन:१०२.०० क्विंटल | | |
| ४,४३० | ४,४५० | ४,४३८ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | | |
| ५,३५० | ५,८०१ | ५,५१७ |

# नारायणगडाची भगवी पताका निघाली दक्षिण काशीला

## 'भानुदास एकनाथा'चा जयघोष करत दिंडीचे पैठणकडे प्रस्थान

**शंकर भालेकर । शिरूर**

**धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगडचा पायी दिंडी सोहळा आज महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण काशीकडे निघाला असून, या दिंडी सोहळ्यामध्ये टाळ मृदंगाचा गजर भानुदास एकनाथाचा जयघोष तीव्र उन्हाच्या उष्णतेमध्ये भक्तीचा गारवा निर्माण करून दिंडी सोहळ्याने मोठ्या आनंदाने पैठण कडे प्रस्थान केले आहे.**

मराठवाड्यामध्ये ज्या सोहळ्याला वारकरी संप्रदायाला तो श्री क्षेत्र पैठण



येथील षष्ठीचा सोहळा चार दिवसावर आले. बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाला नाथ षष्ठी निमित्त पैठणच्या यात्रेला येण्याची वेध लागले आहे.धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गड येथून गेल्या अनेक वर्षापासून नाथ षष्ठी निमित्त पायी दिंडी सोहळा जात असून, ◀◀ पान २ वर

### गुरुदेवांची परंपरा वाढवणे आमचे कार्य

धाकटी पंढरी श्री. क्षेत्र नारायण गड येथून गुरुवर्य महंत वै.महादेव महाराज यांनी श्री.क्षेत्र पंढरपूर व श्री क्षेत्र पैठण या दोन्ही ठिकाणी वर्षातून दोन वेळा पायी दिंडी सोहळा काढून पंचक्रोशीतील भाविक भक्तांना एकत्रित करून गुण्या गोविंदाने नांदायची शिकवले. त्याच परंपरेचे आम्ही पाईक म्हणून हा दिंडी सोहळा मोठ्या थाटाने दरवर्षी पैठण कडे घेऊन जात असतो याही वर्षी मोठ्या संख्येने भाविक भक्त या सोहळ्यामध्ये सहभागी झाले आहेत. या सोहळ्याची व्यापकता वाढावी व परंपरा अखंडित चालावी ही यासाठी सदैव आम्ही तत्पर राहू अशी प्रतिक्रिया शिवाजी महाराजांनी यांनी दिली आहे.

# माजलगाव औद्योगिक वसाहतीमधील आमदार पुत्राच्या कंपनीलाच टाळे

### » मुलभूत सुविधा अभावी आमदार पुत्राचीच कंपनी बंद तर इतर उद्योग येणार कसे ?

### » असेच उद्योग बंद पडले तर सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार कसा निर्माण होणार

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत निर्माण करण्याचे दिवास्वप्न दाखवुन गेल्या तीन दशकापासून सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार देण्याचे आश्वासन देऊन मतदार संघातील सुशिक्षीत बेरोजगारांना झुलवत ठेवण्याचे काम आमदार प्रकाश सोळंके यांनी चालवले आहे. नुसतेच विकासाचे गाजर,घोषणांचा हलवा,आणि गोड




बोलून जनतेला असेच झुलवा!असेच यावरून दिसून येत असून माजलगाव औद्योगिक वसाहतीत निर्माण झालेल्या उद्योगाला मूलभूत सुविधा उपलब्ध न झाल्याने आमदार पुत्राचीच्याच कंपनीला टाळे लागल्यामुळे सुमारे पन्नासच्यावर सुशिक्षीत बेरोजगार कामगारांना रोजगाराला मुकावे लागले आहे.आमदार प्रकाश सोळंके हे, रखडलेल्या विकासाला गती देणार का? असा सवाल सुशिक्षीत बेरोजगार उपस्थित करत आहेत.

बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत तयार करणार असे म्हणत २०१९ च्या विधानसभेला मतदारांची मने जिंकण्यात यश मिळवलेल्या ◀◀ पान २ वर

### औद्योंगिक वसाहतीत मुलभूत सुविधा देता येत नसतील तर आमदारकी काय कामाची ?

राष्ट्रीय महामार्गाला लागून आणि मोठी औद्योगिक वसाहत म्हणून माजलगाव च्या औद्योगिक वसाहत परिचित आहे योग्य मूलभूत सुविधा तात्काळ मिळतील या उद्देशाने अनेक उद्योजक आपला व्यवसाय याठिकाणी सुरू करण्याच्या विचारात होते परंतु दीड दशकापासून येथील औद्योगिक वसाहत मूलभूत सोयीसुविधांचा अभाव राहिल्याने स्व–पुत्राचाच उद्योग बंद पडत असेल तर या औद्योगिक वसाहतीत इतर उद्योग येतीलच कशी?आणखी हीच परिस्थिती कायम राहिली तर नवीन उद्योग न आल्याने रोजगार निर्मिती थांबू शकते.परीणामी मतदार संघातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगारासाठी मुंबई,पुणे,ठाणे,नाशीक व औरंगाबाद सारख्या ठिकाणी रोजगारासाठी स्थलांतर केल्याशिवाय पर्यायच नाही.

cmyk

## अग्रलेख

# जनता पाण्यासाठी त्रस्त, सरकार मात्र नामानिराळे!

मार्च महिन्यातच मराठवाड्यातील धरणांमध्ये अवघा २०.५५ टक्के एवढा अत्यल्प पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे. राज्यातील सहा महसुली विभागातील स्थितीही चिंताजनक आहे. सरासरी ३९.७६ टक्के पाणीसाठा राज्यात शिल्लक आहे. यात नागपूर ५०.१७ टक्के, अमरावती ५१.१९ टक्के, नाशिक ३९.९९ टक्के, कोकण ५२.२३ टक्के तर छ. संभाजीनगर २०.५५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. बीडचे माजलगाव धरण शून्यावर पोहोचले आहे तर मांजरा धरणात अर्धा टीएमसी पाणी शिल्लक आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर धरणात १८.१६ टक्के म्हणजे ६.५१ टीएमसी तर येलदरी धरणात १५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. नांदेडच्या निम्न मनारमध्ये ३२.१० टक्के म्हणजे १.५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. धाराशिवच्या तेरणा धरणात ४.२४ टक्के म्हणजे १.१९ टीएमसी पाणी शिल्लक आहे. मराठवाड्यातील बहुतांश मध्यम व लघु प्रकल्प शून्यावर पोहोचले आहेत.

एकंदर मराठवाड्याला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागणार हे स्पष्ट दिसत आहे. खरे तर राज्यात व विशेषत: मराठवाड्यात यावर्षी अत्यल्प पाऊस झाल्याने अशी भीषण पाणीटंचाई भेडसावणार हे सांगण्यासाठी कुठल्या तज्ज्ञाची वा भविष्यकाराची गरज नव्हती. अगदी शाळकरी पोरालाही टंचाई दारावर उभी असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. त्यामुळे हे प्रशासनात वा सरकारमध्ये बसलेल्यांना कळले नाही, असे मानणे धारिष्ट्याचेच ठरेल. शासनाने सतर्कतेने उपाययोजना हाती घेतल्याचे कुठेही दिसत नाही. सरकारची जुळवाजुळव आणि ती झाल्यावर सरकारच्या खुर्चीचे पाय मजबूत करण्याची कसरत यातच गुंग असलेले सरकार आता तर लोकसभा निवडणूक जाहीर झाल्याने पुरते 'इलेक्शन मोड'वर गेले आहे. युती-आघाड्यांची जुळवाजुळव, जागावाटप, असंतुष्ट-बंडखोरांची मनधरणी व दिल्लीच्या वाऱ्या यातून जनतेच्या होरपळीकडे लक्ष द्यायला राज्यकर्त्यांना वेळच मिळालेला दिसत नाही. त्याच्या परिणामी राज्यातील शहरी व ग्रामीण जनता मार्च महिन्यातच तीव्र पाणीटंचाईला सामोरी जाते आहे. ग्रामीण भागाचा विचार केला तर परिस्थिती आणखी गंभीर आहे. मार्च महिन्यातच ग्रामीण भागात सध्या दरडोई केवळ चार ते पाच लिटर पाणी उपलब्ध होते आहे. हे वास्तव लक्षात घेता येत्या तीन महिन्यांत पाणीटंचाई किती अक्राळविक्राळ रूप धारण करेल याचा अंदाज यावा. उन्हाचा कडाका जसजसा वाढत जाईल तसतशी जनता पाण्यासाठी कासावीस होणार आहे. त्यात भरीस भर म्हणजे यावर्षी पावसाळा उशिराने सुरू होण्याचे व यंदाचा उन्हाळा शतकातील सर्वांत कडक उन्हाळा ठरण्याचे तज्ज्ञांचे भाकित आहे. ऐन निवडणुकीच्या गलबल्यात ही एवढी तीव्र पाणीटंचाई भेडसावणार असतानाही सरकारला याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज कशी काय वाटत नाही? असे कोडे खरे तर सामान्य जनतेला पडले असेल. मात्र, राजकारण्यांना त्याची चिंता वाटत नाही कारण या टंचाईचा सगळा दोष निसर्गावर टाकून नामानिराळे होण्याची सोय त्यांना कायमस्वरूपी उपलब्ध आहे. उलट निवडणुकांमध्ये त्यांना पाणी प्रश्नाचा प्रचंड कळवळा येतो व त्यावरून ही मंडळी रान पेटवतात. पाणी प्रश्न कायमचा संपविण्याच्या गर्जना केल्या जातात, भरमसाठ आश्वासने दिली जातात व निवडणुका जिंकल्या जातात. टँकरमुक्त महाराष्ट्र, जलयुक्त शिवार वगैरे घोषणा याच धाटणीच्या! त्याचे पुढे काय होते हे मात्र कुणी सांगत नाही आणि जनताही त्यांना त्याचा जाब विचारत नाही.

त्यामुळे मग विभागा-विभागात, जिल्ह्या-जिल्ह्यात, एवढेच काय गावा-गावात पाण्यावरून तंटे-संघर्ष सुरू होतात आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या गर्जना करणारे हेच नेते प्रादेशिक अस्मितांचा तडका या संघर्षांना देऊन ते आणखी भडकावतात. या अस्मितेच्या मुद्यांना पुन्हा धर्माची जोड दिली जाते. याचभोवती प्रदेशाचे सर्वपक्षीय राजकारण फिरत राहील याची चोख व्यवस्था केली जाते. पाणीटंचाई निवारणाचे सार्वत्रिक व एकत्रित काम राज्य म्हणून कुठेही सुरू असल्याचे पहायला मिळत नाही.

## आष्टीच्या हंबर्डे कॉलेजचे विद्यार्थी, दोन्ही भाऊ झाले डॉक्टर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एडवोकेट बी.डी.हंबर्डे महाविद्यालय,आष्टी जि.बीड येथील बारावी विज्ञानचे विद्यार्थी सय्यद हुमायुद्दीन आणि सय्यद वलीयुद्दीन यांनी वैद्यकीय क्षेत्रातील अनुक्रमे बीडीएस आणि बीएएमएस पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन,नेत्रदीपक यश संपादन केले आहे.डॉ.सय्यद हुमायुद्दीन यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालयासह औरंगाबाद,घाटी फेलोशिपचा विद्यार्थी असून डॉ.सय्यद वलीयुद्दीन संगमनेर,जि.अहमदनगर येथील सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे.इयत्ता अकरावी ते पदवी संपादन करून याच महाविद्यालयात ३३ वर्ष अध्यापन कार्य करणाऱ्या मौजे चिंचाळा येथील कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांचे हे दोन्ही चिरंजीव आहेत.डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा आष्टी येथे दातांचा दवाखाना आहे.डॉ. सय्यद वलीयुद्दीन पुढील शिक्षणासाठी जाणार आहे.या यशाबद्दल संस्थाध्यक्ष किशोर नाना हंबर्डे,सचिव अतुल शेठ मेहेर,दिलीप शेठ वर्धमाने,डॉ.गणेश पिसाळ,सर्व संचालक मंडळ,प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे,डॉ.निमिश सराफ,वैद्यकीय अधीक्षक डॉ.राहुल टेकाडे,उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब मुटकुळे,अविनाश कंदले,कार्यालयीन अधीक्षिका सरस्वती जाधव,पर्यवेक्षक प्रा.अशोक भोगाडे,डॉ.अभय शिंदे,प्रा.आनंद देशमुखे, पंडित कल्याण पोकळे,चिंचाळा ग्रामस्थ,सर्व प्राध्यापक,कर्मचारी वृंद,पत्रकार यांनी अभिनंदन केले आहे.

# आता डॉक्टरांनाही लागणार इलेक्शन ड्युटी

## राज्यात पहिल्यांदाच जुंपणार निवडणुकीच्या कामाला, पहिला प्रयोग मुंबई महापालिकेच्या डॉक्टरांवर



**मुंबई । प्रतिनिधी**

**शिक्षकांना निवडणुकीच्या कामाला जुंपू नये अशी मागणी होत असतानाच आता थेट डॉक्टरांना देखील निवडणुकीच्या कामाला लावले जाणार आहे. मुंबईच्या इतिहासात पहिल्यांदाच डॉक्टरांना इलेक्शन ड्युटी लावली जाणार आहे. यामुळे रुग्ण सेवेची जबाबदारी असणाऱ्या डॉक्टरांना आता निवडणुकीचे अतिरीक्त काम करावे लागणार आहे.**

### राज ठाकरे यांनी शिक्षकांच्या ड्युटिला केला होता विरोध

निवडणूक आयोगाच्या कामावरून राज ठाकरेंनी अनेक सवाल उपस्थित केले होते. निवडणूक आयोग शिक्षकांना कामाला लावते मग निवडणूक आयोग काय काम करते? ५ वर्षे निवडणूक आयोगाला काय काम असते, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला होता. शारदाश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी राज ठाकरेंची भेट घेऊन शिक्षकांना निवडणूक आयोगाच्या कामाला लावल्याची तक्रार केली होती. मुंबईतून ४१३६ शिक्षकांना आयोगाच्या कामाला लावल्याने मुलांना शिकवणार कोण? असा प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी शिक्षकांनी निवडणूक आयोगाच्या कामाला रुजू होऊ नये. कोण कारवाई करतो ते बघतोच असा इशारा राज ठाकरे यांनी दिला होता.

मुंबई महापालिकेच्या केईएम,सायन,नायर, कुपर आणि नायर डेंटल रूग्णालयातील सुमारे ५०० डॉक्टरांना इलेक्शन ड्युटी लावली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. नर्सेसपासून डिनपर्यंत सर्वांना निवडणुकीचे काम लागल्याने रूग्णसेवेवर याचा परिणाम होणार आहे. मुंबई महापालिका रूग्णालयांतील सुमारे ८० टक्के स्टाफ इलेक्शन ड्युटीवर जाणार आहे. निवडणूक कामातून डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सूट असतानाही निवडणूक आयोगाने डॉक्टरांना निवडणूक ड्युटीवर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केईएम रूग्णालयातील ९०० पैकी ६०० नर्सेसना इलेक्शन ड्युटी लावण्यात आली आहे. यामुळे पालिकेच्या प्रमुख रूग्णालयातील आरोग्य सेवा ठप्प पडण्याची भिती व्यक्त केली जात आहे. निवडणुकीच्या कामातून शिक्षकांना वगळून अन्य कर्मचाऱ्यांना काम देण्याबद्दलच्या सर्व शक्यता तपासून तातडीने उपाययोजना कराव्यात, असे आदेश मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले. यासंदर्भात मुंबईचे आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी तातडीची बैठक घ्यावी, असेही सांगण्यात आले होते. ''शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांस निवडणुकीशी संबंधित कामावर नियुक्त केल्यास त्यांना त्यांच्या शैक्षणिक कामाच्या दिवशी व वेळेस निवडणुकीचे काम दिले जाणार नाही, याबाबतची दक्षता घेण्यात यावी'' असेही या आदेशात नमूद करण्यात आले होते.

# पंकजा मुंडे यांची गाडी मराठा आंदोलकांनी अडवली



केज । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केज तालुक्याच्या दौऱ्यावर असलेल्या भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांची गाडी औरंगपुर जवळील पावनधाम येथे मराठा आंदोलकांनी अडवली. यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. पोलीस संरक्षणात मुंडे यांची गाडी बाहेर काढून देण्यात आली. हा प्रकार बुधवारी दुपारी घडला.

बीड लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार म्हणून पंकजा मुंडे या गेल्या आठवडा भरापासून प्रचाराला लागल्या आहेत.आज केज तालुक्यातील दौऱ्यावर असताना पावनधाम येथील अखंड हरिनाम सप्ताहाला उपस्थित राहण्यासाठी पंकजा मुंडे गेल्या होत्या. पंकजा मुंडे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर केज पोलिसांनी काही आंदोलकांना नोटीस दिल्या होत्या. यापूर्वी साक्षाळपिंप्री येथे मुंडे यांच्या गाडीसमोर काही आंदोलकांनी काळे झेंडे दाखवले होते, त्यामुळे पोलिसांनी खबरदारी म्हणून युसुफ वडगाव सर्कल मधील काही मराठा आंदोलकांना नोटीस दिल्या होत्या. यानंतर बुधवारी पावनधाम परिसरात पंकजा मुंडे यांच्या गाडीसमोर काही कार्यकर्ते जमा झाले, रस्त्यावर गाडी अडवत या आंदोलकांनी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत आंदोलन केले.यावेळी आंदोलक ऐकत नाहीत हे लक्षात आल्यावर पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी लाठीचार्ज करण्याचा आदेश कुणी दिला याची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

# लिंबागणेश येथे जगद्गुरू संत तुकाराम बीज सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे आज संत तुकाराम बीज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे बीज सोहळ्याचे त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी ३७५ वर्ष आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे आजच्या दिवशी सदेह वैकुंठ गमन झाले अशी अख्यायिका आहे त्यामुळे आजचा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. आज पहाटे ४ वाजता श्रीगुरू ईश्वरभारती बाबा मंदिरात



काकड आरती झाली. लिंबागणेश येथील महाराज,वारकरी , यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दुपारी १२ वाजेपर्यंत भजन, किर्तन तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठल नामाचा गजर करण्यात आला. दुपारी १२ नंतर पालखीतून ईश्वरभारती मंदिरापासून तागड ज्वेलर्स स्थित नांदुरकीच्या झाडापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. नांदुरकीच्या झाडाखाली किर्तनाचाव दहिहंडीचा कार्यक्रम झाला. भाविकांनी नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून मनोभावे हात जोडले. ईश्वरभारती मंदिरात भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्यासाठी हभप. अनंतकाका मुळे, हभप. गणपत घोलप, बाजीराव दशमे, पांडुरंग वाणी, विनायक मोरे, बाबु वाणी, शिवहारी कोटुळे, समिक्षा खाडीलकर, विक्रांत वाणी, संतोष वाणी आदिंनी परीश्रम घेतले.

# चिंचाळा येथे कडब्याची गंज पेटवली; शेतकऱ्यांचे नुकसान

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील शेतकरी नंदकुमार चोरमले यांच्या शेतातील जवळपास २००० पेंड्या ज्याची किंमत अंदाजे ४४००० असलेल्या कडब्याची गंज आणि सोयाबीन तुरीचे भुस्कट शेतातील शेजारी असणाऱ्या पप्पू उर्फ रत्नाकर रेपे याने सोमवारी रात्री पेटवली असल्याचा संशय शेतकऱ्याला असल्याने पप्पू रेपे याचे विरुद्ध संशयित म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नंदकुमार चोरमले हे चिंचाळा येथील रहिवाशी असून त्यांची जमीन चिंचाळा ते परडी माटेगाव रस्त्यावर गट नंबर ११ मध्ये दोन हेक्टर आहे या जमिनीमध्ये जिनिंग जवळ जवळपास २००० कडब्याच्या पेंड्या



असलेली गंज जनावरांच्या चाऱ्यासाठी व्यवस्थित लावून ठेवलेली होती. नंदकुमार चोरमले यांनी सोमवारी सहा वाजण्याच्या दरम्यान कडब्याची गंज आणि सोयाबीन आणि तुरीचे भुसकटाचा ढिग व्यवस्थित होता परंतु मंगळवारी सकाळी शेतकरी यांनी शेतात जाऊन पाहिले असता ज्वारीच्या कडब्याची गंज आणि सोयाबीन तुरीचे भुस्कट जळालेल्या अवस्थेत होते. नंदकुमार चोरमले यांचा गतकाही दिवसापूर्वी ऊसही पेटवला होता ही घटना घडल्यानंतर काही दिवसांनी शंसयीत आरोपीने मित्राला फोनवर आपणच ऊस पेटवला असल्याचे सांगितले होते त्यानंतर आज कडब्याची गंज आणि सोयाबीन तुरीचे भुस्कट पेटवले असल्याने शेता शेजारील पप्पू रेपे यांनीच ही गंज पेटवली असल्याचा संशय शेतकरी नंदकुमार चोरमले यांना आहे त्यांच्या फिर्यादीवरून संशयित पप्पू रेपे यांच्याविरुद्ध वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पान १ वरून...

### इथेनॉल निर्मितीवरील

असल्याने साखर उत्पादन यंदा चांगले होईल, असे 'इस्मा'ने पत्रात म्हटले आहे. केंद्राच्या प्रोत्साहनामुळे नवीन सुरू झालेल्या इथेनॉल प्रकल्पांना संकटातून बाहेर काढण्यासाठी परवानगी देण्याची मागणी केली आहे. डिसेंबरमध्ये इथेनॉलसाठी उसाचा रस, बी हेवी मोलॅसिसचा वापर बंद करण्याचा आदेश देऊन या प्रकल्पांची कोंडी केली. यामुळे या प्रकल्पातून होणारी इथेनॉल निर्मिती मोठ्या प्रमाणात घटली आहे. खरे तर इथेनॉल निर्मिती बी हेवी मोलॅसिसपासूनच जास्त होते आणि त्याच्या वापरावरच निर्बंध घातले. १७ लाख टन साखरेपासून इथेनॉल तयार करण्याच्या सूचना दिल्या. आता सुधारित अंदाजानुसार १० लाख टन साखर अतिरिक्त मिळू शकेल याचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी होऊ शकतो. यामुळे केंद्राने इथेनॉल निर्मितीवरील निर्बंध कमी करावेत, असे आवाहन केले आहे. निर्बंध उठविल्यास ३२ ते ३३ कोटी लिटर इथेनॉलची निर्मिती होऊ शकते, असा विश्वास 'इस्मा'ने केंद्रीय सार्वजनिक वितरण विभागाला दिला आहे.

----------

### मंत्री सत्तारांच्या चौकशीचे

खासगी शैक्षणिक संस्थेच्या शाळेच्या खोल्या बनवण्यासाठी या निधीचा वापर करण्यात आला, असा आरोप आहे. याशिवाय मागील वर्षी ठाकरे गटाचे मुखपत्र 'सामना'तून मंत्री अब्दुल सत्तार यांच्या १५० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप करण्यात आला होता. अब्दुल सत्तार यांनी नदी खोदून वाळू उपसली, अशी तक्रार कोटनांद्रा ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी केली आहे. सरपंचांनी सत्तार यांच्याविरोधात विभागीय आयुक्तालयात तक्रार केली आहे. माणिकराव निकम असे तक्रार करणाऱ्या सरपंचांचे नाव आहे. कोटनांद्रा गावात पूर्णा नदी आहे. या पूर्णा नदीत ५००० ब्रास वाळू उचलण्याचे टेंडर सिल्लोड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या नावाने निघाले होते. मात्र त्याठिकाणी ५००० ब्रास ऐवजी तब्बल १ लाख ब्रास वाळू उपसण्यात आली. त्यासाठी थेट नदी खोदण्यात आली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

------------

### सेना-भाजपच्या भांडणात राष्ट्रवादीचा लाभ

महायुतीतील दोन महत्वाच्या जागांचा तिढा होता तो सुटला आहे. नाशिकच्या जागेवर राष्ट्रवादीच्या छगन भुजबळांची वर्णी लागली. तर साताऱ्याच्या जागेवर उदयनराजे भाजपच्याच तिकिटावर लढणार आहेत. साताऱ्याच्या जागेच्या बदल्यात उदयनराजेंची राज्यसभेची जागा राष्ट्रवादीला मिळणार आहे. उरलेल्या दोन वर्षांसाठी राष्ट्रवादीचा उमेदवार राज्यसभेवर जाणार आहे. दरम्यान, दोनच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हेमंत गोडसे यांच्या उमदेवारीसाठी शक्तीप्रदर्शन केले होते. त्याआधी खासदार श्रीकांत शिंदे यांनी हेमंत गोडसे यांच्या नावाची घोषणाच केली होती. मात्र त्यावरुन शिवसेना आणि भाजपमध्ये मोठी वादावादी झाली होती.

हेमंत गोडसे यांच्या शक्तिप्रदर्शनानंतर भाजपचे नाशिकचे बडे नेते थेट मुंबईत पोहोचले होते. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन, नाशिकमध्ये भाजपचाच उमेदवार देण्याचा आग्रह केला होता.

**छगन भुजबळ यांची बाजी**

एकीकडे शिवसेना आणि भाजपची ही वादावादी सुरु असताना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या छगन भुजबळ यांनी बाजी मारल्याचे दिसत आहे. कारण छगन भुजबळ यांनी पुतण्या समीर भुजबळ किंवा आपल्याला उमेदवारी मिळावी अशी इच्छा व्यक्त केली होती. महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने साताऱ्यातील जागेचा दावा सोडला. त्याबदल्यात राष्ट्रवादीला नाशिकची जागा मिळाली.

**नाशिकच्या जागेवरून महायुतीत खडाजंगी**

एकीकडे छगन भुजबळ यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाल्यानंतर शिवसेना शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. नाशिकची जागा सोडणार नाही. कोणाची मर्जी राखावी म्हणून जागेची अदलाबदल होत नाही. तीन टर्मचा आमचा खासदार असताना नाशिकची जागा सोडणे अशक्य, अशी आक्रमक भूमिका शिवसेनेने घेतली आहे.

------------

### फोडाफोडीनंतर संपेल म्हणल्याली ठाकरे,

जागावाटपाचा फार्मुला आघाडीकडून घोषित करण्याअगोदरच उध्दव ठाकरे यांनी राज्यातील १७ जागांचे उमेदवार जाहीर केले. तर दुसरीकडे शिंदे शिवसेनेकडे विद्यमान ११ खासदार असल्याने १३ जागांची मागणी लावून धरली आहे. त्यामुळे त्यांना १२ जागा मिळण्याची दाट शक्यता आहे. २०१९ च्या निवडणुकीत शिवसेनेने २३ जागा लढवून १८ जागा काबिज केल्या होत्या. यावेळी दोन्ही सेनेला ३१ जागा मिळण्याची शक्यता असून गतवेळीपेक्षा ८ जागा जास्त मिळणार आहेत. त्यापाठोपाठ भाजप यावेळी ३१ जागांवर लढण्याची शक्यता असून त्यांच्या कोठ्यातील एक जागा महादेव जानकर यांच्यासाठी सोडली जाणार आहे. २०१९ मध्ये राज्यात भाजप २५ जागांवर निवडणुक लढवून २३ जागांवर विजयी झाले होते. यावेळी त्यांना ५ जागा अधिकच्या मिळणार असून जागा मिळवण्यात भाजप व्दितीय स्थानी राहील असे दिसते.

या लोकसभा निवडणुकीत दोन्ही पवारांच्या राष्ट्रवादीसह काँग्रेसलाही ५-५ जागांचा फटका बसण्याची शक्यता आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस राज्यात २५ जागांवर लढूनही केवळ १ जागांवर विजय मिळवता आला होता. यावेळी काँग्रेस २० जागांवर लढेल असे दिसते. त्यामुळे त्यांच्या ५ जागा गतवेळी पेक्षा कमी होतील. राष्ट्रवादी काँग्रेसने २०१९ मध्ये १९ जागांवर लोकसभा निवडणुक लढवली होती. तर त्यांचे ४ खासदार निवडून आले होते. यावेळी शरद पवार गट १० आणि अजित पवार गट ४ असे दोन्ही पवारांना मिळून १४ जागा दिल्या जाण्याची शक्यता आहे. तसे झाले तर त्यांनाही ५ जागांचा फटका बसेल. या लोकसभा निवडणुकीत ठाकरे आणि शिंदे यांचीच शिवसेना जागावाटपात तरी भाव खावून गेली. पुढे निकालात काय होते, हे कळेलच.

---------

### पंकजा मुंडे भाजपच्या राष्ट्रीय

भूपेंद्रभाई पटेल, विष्णूदेव साय, मोहन यादव, भजनलाल शर्मा, रामदास आठवले, नारायण राणे, अनुरागठाकूर, ज्योतिरादित्य शिंदे, स्मृती इराणी, रावसाहेब दानवे पाटील, शिवराज सिंह चौहान, सम्राट चौधरी, अशोक चव्हाण, विनोद तावडे, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, पंकजा मुंडे, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, पीयूष गोयल, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, के. अण्णामलई, मनोज तिवारी, रवी किशन, अमर साबळे, विजयकुमार गावित, अतुल सावे, धनंजय महाडिक अशी नावे यात आहेत.

----------

### ठाकरेंकडून १७ शिलेदारांची

असल्याचे दिसते. मात्र आघाडीतील काही जागांचा तिढा अजूनही सुटत नसल्याने ठाकरे सेनेने बुधवारी घाईघाईत १८ पैकी १७ उमेदवारांची नावे जाहीर केली. यात अरविंद सावंत, संजय जाधव, राजन विचारे, चंद्रकांत खैरे यांच्या नावाचा समावेश आहे. ठाकरे शिवसेनेने १७ उमेदवार जाहीर केल्यानंतर शरद पवार व काँग्रेसच्या नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

------------

### नारायणगडाची भगवी पताका

या सोहळ्यामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हजारो भाविक भक्त सहभागी होऊन टाळ मृदंगाचा गजर करत भानुदास एकनाथाचा जयघोष दक्षिण काशीच्या दिशेने म्हणजेच श्री क्षेत्र पैठण नगरी कडे आज प्रस्थान केले आहे. महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेला हा सोहळा श्री नगद नारायण महाराजांच्या समाधी मंदिराला प्रदक्षिणा घालून पहिले मुक्कामी म्हणजे शिरूर तालुक्यातील शिरापूर गात या गावाच्या दिशेने निघाला. सोहळ्यामध्ये झेंडेकरी , हंडेकरी, तुळशीवाले, टाळकरी या सोहळ्याची मोठी शोभा वाढवत आहेत. सायंकाळी ६:३० च्या दरम्यान आज सोहळा शिरापूर गात येथे पोहोचल्यानंतर गावकऱ्यांच्या वतीने या दिंडी सोहळ्याला पंगती देण्यात आली. या ठिकाणी कीर्तनाचाही कार्यक्रम होणार असल्याचे आले आहे. शिरापू गात, बाटगव्हाण, सायगव्हाण असे रस्त्यामध्ये तीन मुक्काम केल्यानंतर मुक्कामी पैठणला पोहोचणार आहे. या सोहळ्यामध्ये पंचक्रोशीतून हजारो भाविक भक्त सहभागी झाल्यामुळे या सोहळ्याला मोठे व्यापक रूप आले.

----------

### माजलगाव औद्योगिक वसाहतीमधील

आमदार सोळंके यांनी गेल्या दीड दशकात फक्त औद्योगिक वसाहतीत ढाचा उभा केल्यामुळे मतदार संघात जोरात चर्चा झाली होती ,की मतदार संघातील हजारो सुशिक्षित बेरोजगाराना रोजगार निर्मिती होणार त्यातच भर म्हणून आमदार पुत्रानी एक कापड शिवण्याची कंपनी स्थापन करून पाच पन्नास महिलांना रोजगार देण्याचे काम देखील काही दिवसांपूर्वी केले परंतु या औद्योगिक वसाहतीत रस्ते सोडता कोणतीच मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने आमदार पुत्राचीच कंपनी बंद पडली व या कंपनीतील रोजंदारीवर काम करणाऱ्या महिलांना रोजगारास मुकावे लागले.गेली पंधरा वर्षामध्ये अपेक्षित उद्योग उभे राहीले नाहीत बोटावर मोजण्याइतके उद्योग सुरु झाले परंतु योग्य वीज पुरवठा आणि पाणी न उपलब्ध नसल्याने आपल्या उद्योगाला टाळे लावण्याचे दुर्दैव उद्योजकावर ओढावले. ही वेळ अकार्यक्षम लोकप्रतिनिधी मुळेच उद्योजकांवर आली आहे. केवळ लोकप्रतिनिधी म्हणून मिरवण्यात आमदार सोळंके हे गेल्या काही वर्षांपासून आघाडी घेत असून रखडलेल्या विकासाला प्रकाशाची गती, प्राप्त करून देण्यात मात्र ते अपयशी ठरले आहेत त्यामुळे यावेळी २०२४ च्या विधानसभेला त्यांना याची किंमत मोजावी लागणार आहे.चालु पाच वर्षाच्या कालावधीत ४ वर्ष सत्तेत असताना सुध्दा आमदार प्रकाश सोळंके यांनी दूरदृष्टी असलेला असा कोणताही निर्णय आमदार सोळंके यांनी घेतलेला दिसून येत नाही त्यामुळे ज्या अपेक्षेने मतदारांनी विशेषतः तरुण सुशिक्षित बेरोजगारांनी त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून चार वेळा डोक्यावर घेतले, परंतु आ.सोळंके यांनी मतदार संघातील मतदारांची घोर निराशा करण्याचे काम केले आहे.माजलगाव येथील औद्योगिक वसाहतीला गती देण्यात ते पूर्णतः अपयशी ठरले आहेत.नवनवीन उद्योग या ठिकाणी यावेत यासाठी त्यांनी कोणतेच प्रयत्न केले नसून केवळ या औद्योगिक वसाहतीचे दिवास्वप्न दाखवून सुशिक्षीत बेरोजगारांचा व मतदारांचा विश्वासघात केला असल्याची प्रतिक्रिया माजलगाव,धारुर व वडवणी या विधानसभा मतदारसंघतील मतदारातुन व्यक्त होत आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. २८ मार्च २०२४



## रस्ता अपघातग्रस्त बोबडे पिता-पुत्राला राजेंद्र मस्केंनी केली मदत ..!

**बीड :** – बहिरवाडी येथील हरिराम सूर्यभान बोबडे व त्यांचा मुलगा पवन हरिराम बोबडे रेनॉल्ट डस्टर या चार चाकी वाहनाने बीडवरून लातूरकडे जात असताना केज जवळील कारेगाव फाटा येथे भीषण अपघात झाला. या अपघातात जखमी झालेल्या बोबडे पिता- पुत्रास भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी स्वत:च्या गाडीतून आणले व बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार सूर केले आहेत. भाजपा महायुतीचे उमेदवार, भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ केज येथील आयोजित कार्यकर्ता बैठक पार पडल्यानंतर भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के बीडकडे येत असताना कारेगाव फाटा येथे जमलेली गर्दी पाहून गाडी थांबवली. रस्त्यालगत असलेल्या साधारण पंधरा फुट नालीत पडलेल्या रेनॉल्ट डस्टर गाडीत बोबडे पिता-पुत्र अडकले होते. तातडीने राजेंद्र मस्के व त्यांच्या सहकारी चंद्रकांत फड, बालाजी पवार, अनिल शेळके, सोनू गायकवाड, अविनाश नवले यांनी गाडी बाहेर काढून त्यांची विचारपूस करून धीर दिला व स्वत:च्या गाडीतून तातडीने बीड येथे आणून जिल्हा रुग्णालयात दाखल करून उपचार सुरु केले. बोबडे पिता-पुत्राची प्रकृती स्थिर असून सुखरूप आहेत. वेळेवर मदत केल्यामुळे बोबडे कुटुंबीयांनी राजेंद्र मस्के यांचे आभार मानले.

# अनाथ वंचीतांची शाळा मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा स्पर्धेत जिल्ह्यात पहिली

## शिरूर कासार तालुक्यातील शांतीवन शाळेने पटकावला जिल्ह्यात अव्वल क्रमांक

**आर्वी । प्रतिनिधी**

प्रत्येक शाळेचा शैक्षणिक भौतिक दर्जा सुधारावा या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा हा उपक्रम राबवला गेला केंद्रीय स्तर, जिल्हास्तर ,विभागीय व राज्यस्तर अशा माध्यमातून शाळांची गुणवत्ता केली गेली यामध्ये दुष्काळी शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील शांतीवन शाळा थेट जिल्ह्यात अव्वल क्रमांकावर आलेली आहे.

अनाथ वंचित व उपेक्षित समाजातील विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहात यावेत या उद्देशाने समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी शिरूर कासार तालुक्यातील आर्वी या ठिकाणी शांतीवन नावाची सामाजिक संस्था उभारले या संस्थेमध्ये अद्याप पर्यंत अनाथ वंचित व विविध समाजातील उपेक्षित विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे धडे घेऊन विविध स्तरावर यश संपादन केलेले आहे देणगीदारांच्या दातृत्वावर उभा राहिलेली शांतीवन संस्था आज घडीला भव्य स्वरूपाचा वटवृक्ष बनलेली आहे महाराष्ट्र शासनाच्या वतीने या वर्षीच्या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमामध्ये केंद्रीय स्तर तालुका यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला तर यासह जिल्हास्तरावर देखील शांतीवन शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे यामुळे तीन लक्ष रुपयाचे तालुकास्तरीय व ११ लक्ष रुपयाचे जिल्हास्तरीय पुरस्कार शांतीवन शाळेला प्राप्त झालेले आहेत. यामुळे जिल्हाभरातून शांतीवन शाळेचे विविध क्षेत्रांमधून अभिनंदन होत आहे.





शांतीवन संस्था उभारणी व कार्य यासाठी अद्याप पर्यंत देणगीदारांची मोठी मदत राहिलेली आहे या सर्वांच्या योगदानामुळे शांतीवन आज घडीला एका अमूर्त टप्प्यावर उभी आहे शांतीवन संस्थेत दिले जाणारे दर्जेदार शिक्षण दर्जेदार सुविधा व इतर धोरण मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा या उपक्रमात पात्र ठरल्याने शाळेला पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

–दीपक नागरगोजे, संस्थापक अध्यक्ष शांतीवन

## शेततळ्यात बुडवून मित्रानेच केला मित्राचा खून

माजलगाव । प्रतिनिधी

तोतरे बोलण्याच्या चिडवण्यावरून दोन मित्रात वाद झाला. दरम्यान या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. यावेळी चिडलेल्या मित्राने चिडवणाऱ्या मित्राला शेततळ्यात ढकलून त्याच्या छातीवर बसून त्याचा बुडवून खून केल्याची दुर्दैवी घटना दि २७ मार्च मंगळवार रोजी दुपारी माजलगाव तालुक्यातील पवारवाडी शिवारात घडली.



याबाबत सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की,कुंडलिक श्रीपाद धुमाळ (वय २४) रा.पवारवाडी हा आपल्या दोन मित्रासोबत अशोक खामकर यांच्या शेतात असणाऱ्या शेततळ्याजवळ बसला होता. यावेळी याच गावातील त्याचा मित्र संभा उर्फ महेश उत्तमराव मोरे तेथे आला. यावेळी कुंडलिक धुमाळ याने संभा मोरे याला त्याच्यात असणाऱ्या तोतरे बोलण्याच्या व्यंगावरून चिडवण्यास सुरुवात केली. यावरून दोघात मोठा वाद झाला. या वादाचे पर्यवसान हाणामारी झाले. दरम्यान चिडलेल्या संभा मोरे याने श्रीपाद धुमाळला जवळच असलेल्या शेततळ्यात ढकलून दिले.स्वत:ही त्याच्या छातीवर उडी मारली. व श्वास कोंडेपर्यंत त्याला बुडवून ठेवले. या घटनेत कुंडलिक धुमाळचा जीव निघून गेला. दरम्यान मयताचे वडील भीमराव साधू धुमाळ यांच्या फिर्यादीवरून संभा उर्फ महेश उत्तमराव मोरे यांच्या विरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३०२ भादवी नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक बालक कोळी,सपोनि विजय जोनवल हे करत आहेत.

## शेकापचा उप जिल्हाधिकारी कार्यालयासमोर
# जात प्रमाणपत्रासाठी ठिय्या

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील विद्यार्थ्यासह हजारो नागरिकांचे उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सहा हजार जात प्रमाणपत्र प्रलंबित असताना गेल्या दोन महिन्यापासून जात प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील नागरिक दिवसेंदिवस तहसील कार्यालयासह उपविभागीय कार्यालयाचा उंबरठा झिजवत असताना प्रशासनाकडून जात प्रमाणपत्र वाटप करण्याबाबत सक्षम यंत्रणा उभारली गेली नाही, तसेच अधिकाऱ्यांच्या वेळ काढून धोरणामुळे जात प्रमाणपत्राची संख्या हजारोवर गेली आहे, याबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने अनेक वेळा उपविभागीय अधिकारी कार्यालयात जात प्रमाणपत्र वाटप काढण्याबाबत निवेदने दिले आहेत



परंतु शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने कार्यालयातील अनेक कामे खोळंबून पडलेले आहेत त्यात आचारसंहिता लागल्यामुळे निवडणुकीबाबतची कामे संबंधित कर्मचारी, अधिकारी यांच्याकडे असल्याने जात प्रमाणपत्रे वाटप करण्यात जास्तीचा विलंब झालेला असून तब्बल दोन महिन्यापूर्वीची जात प्रमाणपत्रे आजही कार्यालयात धुळखात पडलेली असून दररोज शेकडो विद्यार्थ्यासह नागरिक कार्यालयात ठाण मांडून असताना प्रशासनाकडून त्यांना न्याय देण्यात आला नसल्यामुळे शेकापचे नेते भाई ऍड नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर ठिय्या मांडला, नेत्यांच्या शिफारसीनुसार जात प्रमाणपत्र वाटप होत असून सर्वसामान्य नागरिक कार्यालयाचे उंबरठे झिजवत असताना प्रशासनाकडून जात प्रमाणपत्र देण्यासाठी टाळाटाळ होत असल्याने शेकडो कार्यकर्त्यांनी कार्यालयासमोर ठिय्या मांडला असल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी नमूद केले. यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई राहुल सोळंके, श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, भागवतराव कोळसे, कृष्णा नेहरकर, हनुमंत गवळी, बाळू पवार, अभिमान जाधव, श्रीराम जाधव, त्रिंबक जाधव, गणेश कोळसे आदी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## मस्जिदवर आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्याला तात्काळ अटक करा –नुमान चाऊस

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील जुन्या भागात सर्व समाजाचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. याच भागात २५ मार्चला मरकज मस्जिदच्या पाठीमागच्या भिंतीवर धुळवडीच्या दिवशी दळणवळण व लोकांची आवक जावक अत्यंत कमी असल्याचा व दुपारच्या वेळेला लोक घरात आराम करत असल्याचा फायदा घेऊन काही समाजकंटकांनी आक्षेपार्ह लिखाण केले होते. मस्जिदच्या आवारात पोलीस प्रशासन ड्युटीवर असताना सुद्धा ही घटना घडली. या लिखाणामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. यावरून असे दिसून येते की त्या समाजकंटकांचा उद्देश दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा होता. सदर घटनेने मोठा नुकसान होण्याची शक्यता होती. पण येथील मुस्लिम समाजाने अत्यंत संयमाची भूमिका घेऊन



कायदेशीर लढा दिला व पोलीस प्रशासनाने या प्रकरणी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पोलीस प्रशासनाने सहकार्य केले. आतापर्यंत या प्रकरणात कुणालाही अटक झालेली नाही तरी आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी प्रसिद्धी पत्रकारा द्वारे केली आहे.

## लेखक दिग्दर्शक महेंद्र पेठकर व प्राणी मित्र नितीन आळकुटे यांची रेडिओ ९०.४ एफएमला विशेष मुलाखत

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

महेंद्र पेठकर यांनी स्व लिखाण करत अनुभव हा लघु चित्रपट निर्मिती केली व त्या लघु चित्रपटाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले या पुरस्काराची दखल घेत रेडिओ ९०.४ एफएम यांनी महेंद्रजी पेठकर यां विशेष मुलाखत घेतली या मुलाखती मधून महिंद्र पेठकर यांनी आपला जीवन प्रवास व्यक्त केला व अनुभव हा लघु चित्रपट तयार करत असताना आलेल्या अडचणी व त्यानंतर निर्माण झालेला अनुभव हा लघु चित्रपट एका आंतरराष्ट्रीय पुरस्कारापर्यंत पोहोचला एक नव्हे तर त्यांना तीन आंतरराष्ट्रीय पुरस्कार व दादासाहेब फाळके पुरस्कारही या लघु चित्रपटाला प्राप्त झाला सर्व पंचक्रोशी मधून महेंद्र पेठकर यांचे कौतुक केले जात आहे व त्यांचा मानसन्मान सत्कार केला जात आहे एका करमाळ्यासारख्या गावामधून कडा येथे नोकरीसाठी आलेले महेंद्र पेठकर यांनी सुंदर असा लघु चित्रपट निर्माण केला याच कार्याची दखल घेत त्यांची काल विशेष मुलाखत रेडिओ ९०.४ एम ला झाली यावेळी त्यांच्या समवेत लेखक दिग्दर्शक निवेदक संतोष जाधव व रेडिओ ९०.४ एफएम चे सर्व टीम बरोबर होती वन्य जीवांचे संरक्षण करणारे दुसरे प्राणी मित्र नितीन आळकुटे






यांचे कार्य २०११ पासून अविरतपणे चालू आहे कडा व पंचक्रोशी मध्ये कोठेही विहिरीमध्ये जर कुठला प्राणी पडला किंवा एखादा पक्षी पतंगेच्या मांज्याने अपघातग्रस्त झाला असेल अशावेळी नितीनजी आळकुटे व त्यांच्या सहकाऱ्यांना कॉल येतो व नितीन जाळ कुठे व सर्व सहकारी त्या मुक्या प्राण्यांचे प्राण वाचवण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालून विहिरीमध्ये उतरून त्या प्राण्यांना बाहेर काढून निसर्गामध्ये मुक्त करण्याचे कार्य नितीन जायकोटे यांचे चालू आहे त्यांच्या या कार्याची दखल घेत रेडिओ ९०.४ एफएम ने काल नितीन जाळकुटे यांची विशेष मुलाखत घेतली या मुलाखतीमध्ये नितीन जाळ कुठे यांनी आपण निसर्गाचे देणे लागत आहोत वृक्षवल्ली आम्हा सोयरे ज्याप्रमाणे वृक्ष आपले सगळे सोयरे आहेत त्याचप्रमाणे या वन्य जीव व प्राण्यांनाही आपण वाचवले पाहिजे व वनवा न लागता तो वनवा लागल्यानंतर कितीतरी सूक्ष्म जीवापासून मोठमोठ्या प्राण्यांची हानी होते याचेही वक्तव्य त्यांनी यावेळी केले व निसर्गाच्या आपण संरक्षण केले पाहिजे प्राण्यांचे संरक्षण केले पाहिजे त्यांना कुठलीही इजा हानी न करता त्यांना आपण या मुक्या प्राण्यांना वाचवले पाहिजे याबाबत नितीन जाळ कुठे यांनी मनोगत व्यक्त केले पण आता उन्हाळ्याचे दिवस आहेत सर्वांनी पक्षांसाठी आपल्या दारात व झाडांना पाणी ठेवावे शेतामध्ये पानवटे तयार करावेत जेणेकरून या उन्हाच्या तीव्रतेमध्ये या मुक्या प्राण्यांचे संरक्षण होईल अशाप्रकारे विशेष मुलाखत महेंद्रजी पेठकर व नितीन आळकुटे यांची रेडिओ ९०.४ एफएम ला झाली यावेळी लेखक दिग्दर्शक निवेदक संतोष जाधव यांचे त्यांना विशेष सहकार्य लाभले.

## संकलेश्वर (बाराखांबी) मंदिराच्या दुसऱ्या टप्प्यातील उत्खननाच्या कामास पुरातत्त्व विभागाकडून सुरुवात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर हे पौराणिक व सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर आहे. याच शहरात अनेक पौराणिक तथा ऐतिहासिक वास्तू मोठया प्रमाणावर आढळतात. असेच येथील ऐतिहासिक ठेवा असलेल्या पुरातन सकलेश्वर (बाराखांबी) मंदिराच्या दुसऱ्या टप्प्यातील उत्खननास पुरातत्व विभागाच्या वतीने सुरवात करण्यात आली आहे. उतखन्नात या ठिकाणी आणखी दोन मंदिरांच्या पायांचा अवशेष आढळला असून, पाच पेक्षा जास्त मंदिरांचे समूह या ठिकाणी असण्याचा अंदाज पुरातत्व विभागाचे अधिकारी लावत आहेत.राज्याच्या पुरातत्त्व (छत्रपती संभाजीनगर) विभागाने याचे काम सुरू केले आहे. या उत्खननाचे काम पूर्ण झाल्यानंतर सकलेश्वर मंदिराचे पुनर्निर्माणही केले जाणार आहे. सकलेश्वर मंदिर हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा प्रस्तावही यापूर्वी (२०२३) पुरातत्त्व ब्व वस्तुसंग्रहालय विभागाने राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागास पाठविलेला आहे. सकलेश्वर मंदिराचे दुसऱ्या टप्प्यातील उत्खनन करण्यासाठी महिनाभरापूर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली होती. त्यासाठी ३४ लाख ७३ हजारांच्या निधीलाही मान्यता मिळाली आहे. याच निधीतून हे उत्खनन करण्यात येत आहे. १५ मार्च २०२४ पासूनच या कामाला सुरवात झाली असली, तरी मुख्य काम शुक्रवार (ता. २३) पासून सुरू झाले आहे. जेवढे काम करावयाचे, तेवढ्या सीमारेषा (१० बाय १०) आखून याचे काम सुरू केले. पुरातत्त्व विभागाचे १० जण, त्यात तांत्रिक व आकाश ऑर्किओलॉजी यांचाही समावेश आहे. याबरोबरच ५० मजूरही कार्यरत असल्याचे सहायक संचालक अमोल गोटे यांनी सांगितले.



राज्य संरक्षित स्मारक सकलेश्वर मंदिराचे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व लक्षात घेता हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करावे, असा संचालनालयाचा अभिप्राय आहे. म्हणून हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करावे, अशी शासकीय स्तरावर मान्यता मिळावी, असा प्रस्ताव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाला पाठविलेला आहे.

पुरातत्त्वीय उत्खननानुसार हे काम सुरू झाले असून, मागील दोन दिवसांत या ठिकाणी आणखी दोन मंदिरांच्या पायाचे अवशेष आढळले आहेत. शिखराला असणाऱ्या कोरीव विटांचे तुकडे, शिल्पावशेष, मूर्तीच्या हाताचे भाग असे अवशेष आढळत आहेत. यादव कालीन मंदिर सकलेश्वर (बाराखांबी) मंदिर हे यादवकालीन स्थापत्य शैलीचा सुंदर नमुना आहे. या मंदिराचा सभामंडप १२ स्तंभावर उभा असल्याने याला बाराखांबी हे नाव रूढ झालेले आहे. या स्तंभावरील शिल्पे कलात्मक अतिशय असून, काही स्तंभावर स्त्री शिल्पे कोरण्यात आलेली आहेत. यादवकालीन एका शिलालेखावर असलेल्या उल्लेखानुसार, या मंदिराचे बांधकाम १२२८ मध्ये केलेले असावे. या मंदिराचा सभोवताल व पुरातन अवशेष पाहता, याठिकाणी पाच मंदिरांचा समूह असावा, कारण पहिल्या टप्प्यातील उत्खननात काही मंदिरांचा पाया (बेसमेंट) आढळून आलेले आहे. पुरातन दृष्टिकोनातून या भागाला महत्त्व असून, या ठिकाणी विविध मंदिरांचा समूह असण्याची शक्यता आहे. हे काम पुढील एक ते दीड महिना सुरू राहणार असून, या उत्खननातून संशोधन व रचनात्मक काम करण्याचा हेतू आहे.

# सेवा नियुक्ती रद्द केल्या नंतरही करतोय रोजगार सेवक बोगस काम

**शिरूर । शंकर भालेकर**

ग्राम रोजगार सेवकाची पंचायत समितीने नियुक्ती रद्द केल्यानंतरही संबंधित रोजगार सेवक मनरेगा अंतर्गत बोगस कामे करत असल्याची तक्रार शिरूर पंचायत समितीला दाखल करण्यात आली आहे. संबंधित कामाची चौकशी करून गट विकास अधिकाऱ्यांनी होणाऱ्या बोगस कामाची बिले रोखवून शासनाच्या आणि जनतेच्या डोळ्यात धुळ फेकणाऱ्या तोतया रोजगार सेवकावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सुरेश जालिंदर उगले व बबन बाबासाहेब उगले यांनी केली आहे.

शिरूर कासार तालुक्यातील कमळेश्वर धानोरा- गाजीपुर या ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गाजीपुर ते नांगरे वस्ती या रस्त्याचे डीपीडीसी अंतर्गत सन २०१४ -१५ मध्ये खडीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. याच रस्त्यावरती नियुक्ती रद्द झालेला रोजगार सेवक सुदाम मसू उगले यांनी पंचायत समितीच्या काही अधिकाऱ्यांशी संगणमत करून महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत सन २०२३- २४ मध्ये या रस्त्याची काम मंजूर करून आणले आहे. व तसे १४ जानेवारी २०२४ प्रत्यक्ष कामालाही सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे या रस्त्यावर काम करणारे मजूर हे बाहेर जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित आहेत. त्या मजुरांची बोगस हजरी पट तयार करून बिले काढण्याचा सपाटा चालवला आहे.दि.२९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत संबंधित रोजगार सेवकाने बोगस





## गाजीपूर ते नांगरेवस्ती कामाची चौकशी करा

मुजरांच्या हजरी पत्रके ऑनलाइन पण करून टाकले आहेत. विशेष म्हणजे या कामावरती एकही रोजगार हमीचा मजूर कामावर करताना दिसून आला नाही हे काम रात्रीच्या वेळी जेसीबी मशीन व ट्रॅक्टर द्वारे केले जात आहे. रोजगार हमी योजनेच्या नावाखाली शासनाला गंडा घालवण्याचे काम हा अतिरिक्त रोजगार सेवक करत आहे.या कामाची चौकशी व्हावी यासाठी गाजीपुर येथील सुरेश जालिंदर उगले व बबन बाबासाहेब उगले यांनी पंचायत समितीला माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागवलेली आहे. या कामाची रीतसर चौकशी करून तोतया रोजगार सेवकाकडून होणाऱ्या मजुरांच्या मस्टरची खातर जमा करावी. आणि जुन्या झालेल्या रस्त्यावरच्या कामावरच नवा निधी टाकून शासनाच्या व जनतेच्या डोळ्यात धूळ करणाऱ्या तोतया रोजगार सेवकाडून शासनाच्या तिजोरीवर लूटमार थांबावी अशी मागणी सुरेश जालिंदर उगले व बबन बाबासाहेब उगले यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह पालकमंत्र्याला दिलेल्या निवेदनात केली आहे.

### शासकीय आदेशाची पायमल्ली

कमलेश्वर धानोरा - गाजीपुर या ग्रुप ग्रामपंचायत मध्ये जालिंदर कचरू जोगदंड यांची रोजगार सेवक म्हणून सन २०१० पासून नियुक्ती करण्यात आलेली आहे. व सुदाम मसु उगले यांची अतिरिक्त रोजगार सेवक म्हणून नियुक्ती २०१६ मध्ये नियुक्ती करण्यात होते . मात्र आर्थिक वर्षामध्ये १००० पेक्षा कमी मनुष्य दिवसाची निर्मिती झालेली असेल, त्या ठिकाणी किंवा ग्रामपंचायत मध्ये ५० हजार मनुष्य दिवसापेक्षा जास्त मनुष्य दिवस निर्माण होतात अशा केवळ दोन प्रकारच्या ग्रामपंचायत मध्ये अतिरिक्त रोजगार सेवकाची नियुक्ती करण्यावी अन्यथाची नियुक्ती अवैद्य माणण्यात यावी असे शासनाचे आदेश होते. या निकषांमध्ये सुदाम उगले या अतिरिक्त रोजगार सेवकाची दि.१७ ऑक्टोबर २०२३ पासून नियुक्ती शिरूर पंचायत समितीच्या वतीने रद्द करण्यात आली होती. व त्यांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत केलेल्या कामाच्या मस्टरवर सह्या करण्यात येऊ नये नसता शासनाच्या आदेशाचे पालन केले नाही असे समजून कारवाई केली जाईल असे आदेशित पत्रही देण्यात आले होते असे असूनही सुदाम मसु उगले या रोजगार सेवकांनी सन २०२३- २४ च्या कामाच्या मस्टरवर सह्या करून मस्टर ऑनलाईन करण्याचा प्रताप केल्याचा प्रकार तक्रारदाराकडून उघडकीस येत आहे. यामुळे शासनाच्या आदेशाच्या पायमल्ली करणाऱ्या सुदाम उगले नामक रोजगार सेवकावर कारवाई होईल का असा प्रश्न या ठिकाणी उभा राहत आहे.

cmyk




# शेतकऱ्यांकडून पाच लाख टन रब्बी कांदा खरेदी करणार; केंद्राची माहिती!

नवी दिली : कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. मागील आठवड्यात केंद्र सरकारकडून कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचे अधिकृतरित्या जाहीर करण्यात आले. अशातच आता पुन्हा एकदा केंद्रीय ग्राहक संरक्षण विभागाकडून सरकारी कांदा खरेदीबाबत माहिती समोर आली आहे. ज्यात देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून पाच लाख टन रब्बी कांद्याची खरेदी करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे आता केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळणार आहे.

मागील आठवड्यात केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी ३१ मार्च २०२४ नंतर कायम राहणार असल्याचे म्हटले होते. ज्यामुळे आता केंद्रात नवीन सरकार स्थापन होईपर्यंत अनिश्चित काळासाठी निर्यातबंदी कायम राहणार आहे. याबाबत बोलताना ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव रोहित कुमार सिंह यांनी म्हटले आहे की, केंद्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत गंभीर असून, येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये



शेतकऱ्यांकडून एकूण पाच लाख टन रब्बी कांद्याची खरेदी सुरू करण्यात येणार आहे. निर्यातबंदीमुळे शेतकऱ्यांना त्रास होणार नाही, याची काळजी सरकारी पातळीवरून घेतली जात आहे. राज्यात सध्याच्या घडीला बाजारात कांद्याला सरासरी ११०० ते १३०० रुपये प्रति क्विंटलचा दर मिळत आहे. मागील वर्षी

### एनसीसीएफमार्फत होणार खरेदी

केंद्राकडून केली जाणारी ही कांद्याची सरकारी खरेदी नॅशनल को-ऑपरेटिव्ह कॉन्समर्स फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एनसीसीएफ) या नोडल एजन्सीमार्फत ही खरेदी केली जाणार आहे. मागील वर्षी केंद्र सरकारकडून जून महिन्यामध्ये सरकारी कांदा खरेदी सुरु केली होती. त्यातुलनेत यंदा उन्हाळ कांद्याचे उत्पादन घटणार असल्याने, केंद्र सरकारने राखीव साठ्यासाठी आधीच कांदा खरेदी करण्यास सुरुवात केली आहे.

या कालावधीत कांद्याला मिळत असलेले दर सध्याच्या दरांपेक्षा निम्म्याने कमी होते. अशातच आता राखीव साठ्यासाठी केंद्राकडून पाच लाख टन रब्बी कांद्याची खरेदी करण्यात येणार आहे. ज्यामुळे कांद्याच्या दरात काहीशी वाढ होण्यास मदत होणार आहे. मागील वर्षी याच कालावधीत केंद्र सरकारने एकूण ६.४ लाख टन रब्बी आणि खरीप दोन्ही कांद्यांची खरेदी केली होती.

## खरेदीखत म्हणजे काय? त्यासाठी कोणती आवश्यक कागदपत्रे लागतात?

खरेदीखत मग ते शेतीचे असो की घर बांधण्यासाठी जमिनीचे व्यवहार करतानाचे असो पण हा शब्द आपल्या कानी पडतोच. मात्र, खरेदीखत म्हणजे नेमके काय याचा कधी आपण अभ्यास केला नसेल. किंवा खरेदी खतासाठी कोणती कागदपत्रे लागतात यापासून अनेकजण हे अनभिज्ञ असतात. त्यामुळे जमिनीचे व्यवहार होताना ऐनवेळी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे खरेदीखत म्हणजे नेमके काय आणि त्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात हे आपण माहिती करुन घेणार आहोत.जमिनीच्या व्यवहाराच्या वेळी, जमीन खरेदीदार आणि विक्रेत्याच्या संमतीने रक्कम निश्चित केली जाते. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर तुम्ही खरेदीखत करू शकता. खरेदी केल्यानंतर जमिनीची मालकी हस्तांतरित केली जाते. जमीन खरेदी केल्यानंतर व्यवहार पूर्ण झाल्याचा पुरावा म्हणजे खरेदीखत.

अशी आहे प्रक्रिया : खरेदीखतासाठी पहिल्यांदा खरेदी केल्यावर मुद्रांक शुल्क काढून घ्यावे लागेल. यासाठी, जमीन आहे त्या ग्रामीण भागातील संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये बाजारभावाप्रमाणे मूल्यांकन करून मुद्रांकशुल्क काढून घ्यावे. मूल्यांकन शुल्क काढून देण्याचे काम दुय्यम निबंधक करतो. मुद्रांकशुल्क काढल्यानंतर दुय्यम निबंधक खरेदी खत दस्तऐवजासाठी लागणारे नोंदणी शुल्क व कागदपत्रे कार्यालयीन खर्चाची माहिती देतात. तसेच, सर्वे नंबर, जमिनीचा प्रकार, जमीन मालकाचे नाव, जमिनीचे क्षेत्रफळ, जमीन खरेदी-विक्रीचा उद्देश या सर्वांचा उल्लेख दुय्यम निबंधकाने निश्चित केलेल्या मुद्रांक शुल्कावर करावा लागतो.खरेदीखतासाठी आवश्यक कागदपत्रे : खरेदीखत तयार करण्यासाठी सात बारा, मुद्रांकशुल्क, आठ अ, मुद्रांक शुल्काची पावती, प्रतिज्ञापत्र, फेरफार, दोन ओळखीच्या व्यक्तींचे फोटो, ऑर्डर ची प्रत ही कागदपत्रे जोडून याबरोबर डाटा एन्ट्री करून दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये दस्त नोंदणी साठी सदर करावा लागतो.

हे लक्षात असू द्या : खरेदिखत करण्यापूर्वी जमीन खरेदी करणार्याने जमीन मालकाला ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे सर्व रक्कम पूर्ण करायची असते. जर सर्व रक्कम पूर्ण झाली नसेल तर खरेदीखत करू नये. कारण एकदा खरेदीखत झाले की नंतरचा जमीन मालक हा त्या जमिनीवरचा मालकी हक्क काढून घेत असतो. खरेदीखत सहजासहजी रद्द होत नाही. खरेदीखत रद्द करण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाला असतो. जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाकडे लक्ष द्या. जमिनीच्या खरेदी आणि विक्रीमध्ये सतत बदल होत असतात. असे बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. त्यानुसार नियम आणि कायद्याची माहिती घेऊनच व्यवहार करणे आवश्यक आहे. अन्यथा सर्व प्रक्रिया होऊनही काम पूर्ण होणार नाही.



## जनावरांना होणारी विषबाधा; जाणून घ्या लक्षणे आणि उपाय!

बऱ्याचदा जनावरांच्या खाण्यात विषारी वनस्पती किंवा अखाद्य पदार्थ आल्यास त्यांना विषबाधा होते. युरिया कीटकनाशके, तणनाशक, उंदीरनाशक इत्यादी रासायनिक घटक किंवा त्याचे अंश जनावरांच्या खाद्यात गेल्यामुळे विषबाधा होते. यासाठी वेळीच योग्य उपाय केले नाही तर जनावरे मृत्युमुखी सुद्धा पडतात. युरियाची विषबाधा : युरियाचा पशू खाद्यामध्ये अधिक वापर. उदा. युरिया- मोलॅसिस, मुरघास, युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्यासोबत सोयाबीन पेंड किंवा सोयाबीन भरडा खाऊ घालणे, युरिया किंवा इतर खतांची पोती जनावरांनी चाटणे, दुभत्या जनावरांना खुराकातून अधिक प्रमाणात युरिया खाऊ घालणे इत्यादी कारणामुळे ही विषबाधा होते.

विषबाधेची लक्षणे : नावरांच्या तोंडाला फेस येऊन त्यांना झटके येतात जनावरांना नीट उभे राहता येत नाही. जनावरांची पोटफुगी होते. पोटामध्ये वेदना होतात. जनावरे सतत उठ बस करतात. थोडी थोडी लघवी करतात. जनावरांचे डोळे मोठे होतात, जनावरे बेशुद्ध होतात व शेवटी मृत्यू होतो. अधिक प्रमाणात युरिया खाल्ला असेल, तर अर्ध्या तासामध्येच मृत्यू होतो

उपचार : विषबाधा झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्वरित जनावरांना २ ते ८ लिटर ताक पाजावे. ताक उपलब्ध नसल्यास माठातील किंवा रांजणातील थंड पाणी पाजावे. मोठ्या जनावरांना ४० लिटर व लहान जनावरांना २० लिटर पाणी पाजावे. पोटातील हवा काढण्यासाठी जनावरांच्या तोंडात लगाम घालावा. यामुळे जनावरांचे तोंड सतत उघडे राहून पोटातील अमोनिया वायू बाहेर



पडेल. शक्य तितक्या लवकर पशु वैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत.

ज्वारीच्या कोवळ्या पोंग्याची विषबाधा : या विषबाधेला 'किरळ लागणे' असेही म्हणतात. ज्वारीच्या कोवळ्या पोंग्यामध्ये धुरीन नावाचा विषारी घटक असतो. जनावरांनी पोंगे खाल्यानंतर पोटात धुरीनपासून हायड्रोसायनिक ॲसिड तयार होते. हे हायड्रोसायनिक ॲसिड जनावरांमध्ये विषबाधा करते.

लक्षणे : जनावरांनी ज्वारीचे कोवळे पोंगे जास्त प्रमाणात खाल्ले तर जनावरांचा मृत्यू होतो. कमी प्रमाणात पोंगे खाल्ले तर जनावराचे पोट फुगते, जनावर अस्वस्थ होते. श्वासोच्छ्वास व हृदयाचे ठोके वाढतात. श्वसनाला त्रास होतो, जनावरे थरथर कापते.

उपचार : जनावरांचे पोट फुगलेले दिसताच त्वरित पशु वैद्यकाच्या सल्ल्याने तातडीने उपचार करावेत.

ऑक्झॅलिकची विषबाधा : काळा बुरशीयुक्त कडबा जनावरांच्या खाण्यात आल्यास, रब्बी गहू- हरभरा पिकांत वाढणारे ''ढोरकाकडा'' नावाचे तण जनावरांनी खाल्ल्यास ही विषबाधा होते.

लक्षणे : या विषबाधेमुळे रक्तात कॅल्शियमची कमतरता निर्माण होते. त्यामुळे अडखळत चालणे, कुंथणे, पोटफुगी, लघवी, थेंबाथेंबाने होणे किंवा अजिबात न होणे. गुदद्वारापासून ते मागील दोन पायांतून अंडकोषापर्यंत सूज आलेली आढळून येते.

उपाय : बुरशीयुक्त कडबा अथवा गहू- हरभऱ्यांतील उपटून टाकलेले तण जनावरांना खाण्यास देऊ नये. विषबाधेचे प्रमाण कमी करण्यासाठी कॅल्शियमचे इंजेक्शन पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने द्यावे.

सरकीची विषबाधा : दुधाळ जनावरांना अथवा बैलांना सरकी देण्यात येते. कीटक प्रतिबंधक व अधिक उत्पादन देणाऱ्या कपाशीच्या सरकीमध्ये गॉसीपॉल या विषारी द्रव्याचे प्रमाण अधिक असते. गॉसीपॉलयुक्त सरकी जनावरांच्या सतत खाण्यात आल्यास दीर्घकालीन विषबाधा होण्याची शक्यता असते. उपाय : सरकी जनावरांना सतत खाण्यात देऊ नये. चार आठवडे सतत खाद्य दिल्यानंतर एखादा आठवडा खाद्य देऊ नये.

## कीड व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती

कीटक हे पृथ्वीतलावरील आकर्षक व लक्षवेधक जीव आहेत. सर्व प्राणी जातीचा विचार केल्यास दोन तृतीयांश किटकाच्या जाती आहेत. कीटक हे मनुष्याच्या कित्येक वर्ष आधी जवळपास ३५० दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीतलावर निर्माण झाले आहेत. कीटक हे ५ प्रकारच्या परिस्थितमध्ये आढळून येतात. जमिन, पाणी, हवा तसेच बर्फ आणि वाळवंटातदेखील कीटक आढळून येतात. कीटक म्हटल्यावर आपल्यासमोर घरातील माश्या, डास, झुरळ, मुंग्या इत्यादी हानिकारक किडी येतात. कीटक हे मानवास हानि पोहचवितात, पण काही कीटक फायदेशीर आहेत. कीटक हे जवळपास प्रत्येक वनस्पतीवर आढळून येतात. मनुष्यात अन्न, वस्त्र व निवारा उपलब्ध करून देणाऱ्या विविध पिकावर किटकांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे नुकसान होते. पिकाशिवाय साठविलेले अन्नधान्याचे देखील कीटक मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. तसेच काही कीटक वनस्पतीमध्ये रोगाचा प्रसार करतात.

किडींच्या नुकसान करण्याच्या पद्धती : १. वनस्पती कुरतडून खाण्याऱ्या किडी उदा. नाकतोडा, टोळ, अळ्या, भुंगेरे या किडी पाने,वनस्पतीचे इतर भाग कुरतडून खातात. २. रस शोषण करणाऱ्या किडी : उदा. मावा, तुडतुडे, पिठ्या ढेकूण, खवले कीड, ढेकूण, या किडी टोकदार अवयव वनस्पतीमध्ये खुपसून रसशोषण करतात. ३. गाठी निर्माण करणाऱ्या किडी: उदा. गादमाशी, आंब्यावरील मिजमाशी, इत्यादि या किडी पानावर



किंवा इतर भागावर गाठी निर्माण करतात. ४. मुळावर उपजिविका करणाऱ्या किडी : उदा. ऊसातील मुळा कुरतडणारी अळी, हुमणी, वाळवी, मावा या किडी वनस्पतीच्या मुळा पोखरुन कुरतडून किंवा रस शोषण करुन उपजिविका करतात. ५. अंडी देण्यामुळे नुकसान करणाऱ्या किडी: उदा. तुडतुडे, फळमाशी या किडी कळया, फुले किंवा फळामध्ये अणकुचीदार अवयवाद्वारे अंडी घालतात. त्यामुळे त्यावर जखमा झाल्यामुळे नुकसान होते. ६. वनस्पतींचा भाग पोखरून नुकसान करणाऱ्या किडी: उदा. खोड किडा, फळ पोखरणाऱ्या कीडी, नागअळी, फळमाशी, बोंडअळी. या किडी खोड, फळे, पाने, बोंडे इत्यादी पोखरून नुकसान करतात. ७. रोगांचा प्रसार करणाऱ्या किडी उदा. मावा, फुलकिडे, पांढरी माशी. या किडी वनस्पतीमध्ये सुक्ष्म जंतुद्वारे होणाऱ्या रोगाचा प्रसार करतात.

किटकनाशके वापरताना घ्यावयाची काळजी, फवारणीनंतर पीक काढणीचा काळ या बाबीसुध्दा माहिती असणे आवश्यक आहेत.

कीड व्यवस्थापनाच्या पध्दती : १. मशागतीय पध्दती: पीक उत्पादनासाठी शेतकरीवापरत असलेल्या तंत्रज्ञानाचा कीड व्यवस्थापनासाठी उपयोग करणे, याला मशागतीय पध्दती म्हणतात. यामुळे पिकांना पोषक व किडींना प्रतिकुल वातावरण निर्माण होतो. उदा. नांगरणी, कोळपणी, काडीकचरा नष्ट करणे, निरोगी बी-बियाणे वापरणे, तणांचा बंदोबस्त, योग्यवेळी पेरणी, प्रतिकारक्षम वाणांचा वापर, पिकाची फेरपालट, सापळा पिके, मिश्र व आंतर पिके, पाणी देणे. क्षेत्रीय पेरणी, बीजप्रक्रिया. २. यांत्रिक पध्दती विविध यंत्र किंवा उपकरणे आणि मानवी शक्तीचा वापर करुन किडींना मारणे किंवा किडींना खाद्यपर्यंत पोहचू न देणे, याला यांत्रिक पध्दती म्हणतात. उदा. हाताने किडी जमा करणे, कीडग्रस्त भाग नष्ट करणे, जाळीने किडी पकडणे, प्रकाश सापळे, कामगंध सापळे, धान्य चाळणे, चिकट सापळे, खोडाभोवती चिकट पदार्थ किंवा पत्रा लावणे, शेताभेवती चर खोदणे, फळांना झाकणे, धूर करणे, आग निर्माण करणारे यंत्र. ३. भौतिक पध्दती : वातावरणाचे अजैविक घटक : जसे तापमान, आर्द्रता ईत्यादीमध्ये बदल घडक कीड व्यवस्थापन करण्याला भौतिक पध्दत म्हणतात. उदा. धान्य वाळविणे, उष्ण पाण्याची प्रक्रिया, साचलेले पाणी काढून टाकणे, लाकडाचा भुसा किंवा राखेचा वापर, कमी तापमानात वस्तु ठेवणे, प्रकाश, ध्वनी यांचा वापर. ४. जैविक पध्दती किडींच्या नैसर्गिक शत्रुद्वारे व्यवस्थापनाला जैविक पध्दती म्हणतात. उदा. परभक्षी कीटक (लेडीबर्ड बीटल, क्रायसोपा, भक्षक ढेकूण), परोपजीवी कीटक (ट्रायकोग्रामा, अपेंटेलीस), सुक्ष्म जीव (बुरशी, विषाणू, जीवाणू), कोळी, पक्षी इत्यादी, ५. रासायनिक पध्दती किटकनाशकांचा वापर करुन कीड व्यवस्थापन करणे याला रासायनिक पध्दती म्हणतात. उदा. निंबोळी अर्क, क्लोरपायरिफॉस, ईमाडाक्लोप्रीड, सायपरमेथ्रीन, स्पिनोसॅड इत्यादी.




### जागतिक दिवस
### राष्ट्रीय नौका दिवस

### महत्वाच्या घटना

१५६१ : मुघल बादशाहा अकबर यांनी मालवा प्रांताची राजधानी 'सारंगपूर' येथे हल्ला करून तेथील सुलतान बाजबहादूर यांचा पराभव केला.
१८४९ : ब्रिटीश ईस्ट ईंडिया कंपनीने पंजाब खालसा केले.
१८४९ : ब्रिटिश साम्राज्याने पंजाब ताब्यात घेतले.
१८५७ : क्रांतिकारक मंगल पांडे यांनी बराकपूरच्या छावणीमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या व इथूनच १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाला खरी सुरुवात झाली.
१८५७ : बेंगाल नेटिव्ह इन्फंट्रीच्या ३४ व्या तुकडीतील शिपाई मंगल पांडे याने इस्ट इंडिया कंपनीतील ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या. या घटनेतुनच १८५७ च्या राष्ट्रीय उठावाची सुरूवात झाली.
१९३० : 'प्रभात'चा 'खूनी खंजिर' हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला.
१९४२ : क्रिप्स योजना जाहीर
१९५४ : भारत सरकारच्या कार्मिक मंत्रालया अंतर्गत कार्यरत असलेली संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच 'भारतीय लोक प्रशासन संस्था' ची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे प्रथम अध्यक्ष टी. एन. चतुर्वेदी होते. तसचं, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू हे या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहे.
१९६२ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते पिंपरी येथील हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या पेनिसिलिन कारखान्यातील स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादन प्रकल्पाचे अनावरण झाले.
१९६८ : महात्मा फुले कृषी विद्यापीठाची राहुरी येथे स्थापना
१९६९ : भा. द. खरे यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर 'अमृतपुत्र' ही कादंबरी लिहिण्यास प्रारंभ केला.
१९७० : दत्तो वामन पोतदारांने 'शिवचरीत्र' ह्या ग्रंथाच्या लेखनास प्रारंभ केला.
१९७३ : व्हिएतनाम युद्ध व्हिएतनाममधुन शेवटचा अमेरिकन सैनिक बाहेर पडला.
१९८२ : एन. टी. रामाराव यांनी तेलगू देसम पक्षाची स्थापना केली.
२००४ : भारतीय फलंदाज वीरेंद्र सेहवाग याने पाकिस्तान विरुद्ध कसोटी क्रिकेट सामन्यात ३०९ धावांची खेळी केली व त्रिशतक झळकवणारा पहिला भारतीय फलंदाज झाला.
२००४ : आयर्लंड देशाने कामाच्या ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी घातली. अश्या प्रकारची बंदी लागू करणारे ते जगातील पहिले राष्ट्र ठरले. २९ मार्च या तारखेपासून सार्वजनिक आरोग्य (तंबाखू) अधिनियमांतर्गत बंद असलेल्या कार्यलयाच्या परिसरात धूम्रपान करणे बेकायदेशीर ठरले आहे.
२०१४ : इंग्लंड आणि वेल्स मध्ये प्रथम समलिंगी विवाह झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६९ : सर एडविन लुटेन्स दिल्लीचे नगररचनाकार (मृत्यू: १ जानेवारी १९४४)
१९१३ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेता हिंदी भाषिक कवी व लेखक भवानी प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१८ : वॉलमार्ट चे निर्माते सॅम वॉल्टन यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल १९९२)
१९२६ : पांडुरंग लक्ष्मण तथा 'बाळ' गाडगीळ अर्थशास्त्रज्ञ व विनोदी लेखक (मृत्यू: २१ मार्च २०१०)
१९२८ : भारताचे परराष्ट्र सचिव तसेच, दिल्ली, अंदमान आणि निकोबार या केंद्रशाशित प्रदेशाचे माजी उपराज्यपाल. याचप्रमाणे त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश या राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचा जन्मदिन.
१९२९ : उत्पल दत्त रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमात आपला ठसा उमटवणारे कलाकार (मृत्यू:१९ ऑगस्ट १९९३)
१९३० : अनिरुद्ध जगन्नाथ मॉरिशसचे पंतप्रधान
१९३९ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेता व हास्यकलाकार सय्यद इश्तियाक अहमद जाफरी उर्फ जगदीप यांचा जन्मदिन.
१९४३ : जॉन मेजर इंग्लंडचे पंतप्रधान
१९४८ : नागनाथ कोतापल्ले साहित्यिक, शिक्षणतज्ञ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू
१९९८ : भारतीय व्यावसायीक गोल्फ खेळाडू अदिती अशोक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५२ : शिखांचे दुसरे गुरू गुरू अंगद देव यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १५०४)
१९६२ : करमचंद थापर, भारतीय उद्योगपती.
१९६३ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार व राष्ट्रकवी सियारामशरण गुप्त यांचे निधन.
१९६४ : शंकर नारायण जोशी, भारतीय इतिहाससंशोधक
१९७१ : धीरेंद्रनाथ दत्ता बांगलादेशी राजकारणी (जन्म: २ नोव्हेंबर १८८६)
१९९७ : पुपुल जयकर सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (जन्म: ११ सप्टेंबर १९१५)

# व्यवस्थेविरोधात लढताना शेतकऱ्यांनी मनोबल खचू देऊ नये

## श्यामसुंदर महाराज सोन्नर यांचे आवाहन : शेतकरी कीर्तन महोत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता

परळी । प्रतिनिधी

शेतकरी सर्व बाजूंनी संकटात सापडला आहे. एकीकडे निसर्गाने या वर्षी अवकृपा केली आहे. तर दुसरीकडे शेत मालाचे भाव कोसळले आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. अशा कसोटीच्या काळात शेतक-यांनी व्यवस्थेविरोधात लढताना मनोबल खचू देऊ नये, असे आवाहन ह.भ.प. शामसुंदर महराज सोन्नर यांनी शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या काल्याच्या कीर्तनात केले. या महोत्सवातून शेतक-यांना जगण्यासाठी आणि लढण्यासाठी मनोबल मिळेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. शेतकरी कीर्तन महोत्सवाची सांगता बुधवारी शामसुंदर महराज सोन्नर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, शेती हा संत तुकारामांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होता. शेतीच्या बाबतीत अक्षरशः असंख्य तपशील त्यांनी शेती करण्याच्या स्वानुभवातूनच मिळविले होते. शेती करणाऱ्यांसाठी त्यांनी आपले हे अनुभव पुनःपुन्हा आपल्या अभंगातून सांगितले आहेत. शेती आणि अध्यात्म हे एकरूप आणि एकजीव करण्याचे काम जगतगुरू तुकाराम महाराज यांनी केले असून आपल्या अभंगात शेतकऱ्यांचे जीवन विषद करत असताना संत तुकाराम महाराज सांगतात,

''मढे झाकुनिया करिती पेरणी ! कुणबियाची वाणी लवलाहे !! तयापरी करा स्वहित आपुले ! जयासी फावले नरदेह !! शेतकरी, कुणबी हे आपल्या घरी कोणी वारले असेल मरण पावले असेल तर ते प्रेत झाकुन ठेवुन अगोदर पेरणी करतात कारण पेरणी महत्त्वाची आहे. आणि हीच खरी शेतकरयांची, कुणबी यांची वाणी आहे खरा धर्म आहे. असे प्रबोधनकार हभप श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी जगतगुरू संत तुकाराम महाराज बीज निमित्ताने आयोजित शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या सांगता समारोप प्रसंगी आपल्या काल्याच्या कीर्तनात विषद केले.

शेतकरी वर्गाला केंद्र स्थानी ठेऊन सलग दुसऱ्या वर्षी जगतगुरू तुकाराम महाजन बीज निमित्ताने धारूर तालुक्यातील कांन्नापूर येथे २१ गावच्या एकोप्यातून शेतकरी कीर्तन महोत्सव संपन्न झाला. या कीर्तन महोत्सवात कोणत्याही प्रकारचा झगमगाट न करता प्रबोधन आणि शेतकरी आरोग्य याला प्राधान्य दिले असून दररोज दिवशी एका आजारावर आरोग्य शिबीर,मार्गदर्शन व मोफत उपचार करण्यात आले ज्यामध्ये नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉक्टर तात्याराव लहाने, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोळकर, कर्करोग तज्ज्ञ डॉ. हरीराम गडदे,हृदयरोग तज्ञ डॉ.बिराजदार आदींची उपस्थिती होती. या शेतकरी कीर्तन महोत्सवाची सांगता बुधवार दि २७ रोजी हभप श्यामसुंदर सोन्नर महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने संपन्न झाली यावेळी बोलताना सोन्नर महाराज म्हणाले की संत तुकाराम महाराज हे सावकार होते,मोठे व्यावसायिक होते मात्र कुणब्याबद्दल त्यांना जास्त कळवळा होता.शेतकरी आत्महत्यासारख्या अप्रिय घटना घडू नये यासाठी शेतकऱ्यांना न मागता त्यांनी कर्जमाफी केली आणि शेतकऱ्यांना उद्देशून्य बोलताना ते सांगायचे की, ''तोडुनिया फळे,वाया जाती काशिफळे'' शेतातील पीक परिपक्व बनल्याशिवाय कुणब्यानी ती तोडू नये नसता भाव वाढला म्हणून अपरिपक्व पीक मातीमोल विकण्याची वेळ येऊ शकते.सद्सद्विवेक बुद्धीने शेतकऱ्यांनी आपली शेती करावी यज्ञ आणि दान करण्यासारख्या अंधश्रद्धा बाळगू नये असे ही त्यांनी आपल्या कीर्तनातून सांगितले.



अध्यात्माला विज्ञानाची जोड देत शेतकरी आणि शेती याबद्दल सुरू असलेल्या या शेतकरी कीर्तन महोत्सव सांगता समारोपात संयोजक एड.अजय बुरांडे यांनी मागील सात दिवस २१ गावातील अबाल-वृद्ध, महिला,तरुण या सर्वांनी हे कीर्तन महोत्सव यशस्वी करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले असून औपचारिक म्हणून आभार करत हा विज्ञानवादी अध्यात्मिक यज्ञकुंड जो मागील वर्षी प्रज्वलित केला हे असाच कायम यापुढे आपल्या सर्वांच्या सहकार्याने तेवत ठेवून अधिकाधिक हा शेतकरी कीर्तन महोत्सव दर्जेव्दार करण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले. कोणतेही मानधन न घेता प्रबोधनकारांचे कीर्तन २१ गावाचा सहभाग सकाळ, दुपार, संध्याकाळ एक गावाची पंगत घरोघरात बनविलेल्या भाकरी कीर्तनास्थळी प्रसादरूपी वाटप सात दिवसात विविध आजाराच्या हजारो रुग्णांवर मोफत उपचार हा कीर्तन महोत्सव यापुढे पण सुरू राहणार असा २१ गावच्या ग्रामस्थाचा निर्धार.

## गरिबाच्या कल्याणासाठी कॉ.काशिनाथ कापसेंनी आयुष्य झिजवले - माजी आ.देशमुख

अंबाजोगाई। प्रतिनिधी

कॉ.काशिनाथ कापसे यांच्या आयुष्याकडे पाहिल्यानंतर वंचित, उपेक्षित, गरीब कल्याणासाठी जणु काही त्यांचा जन्म झाला. त्यांच्या सेवेसाठी संपुर्ण आयुष्य समर्पित करताना तत्कालीन काळात त्यांनी केलेला संघर्ष धाडसी स्वभावाची साक्ष देणारा होता. माझ्या आयुष्यात कापसे गुरूजी आले नसते तर मी आमदार पदापर्यंत पोहोचलोच नसतो हे सांगताना संवेदनशीलता आणि परोपकार भावना असंघटित लोक कल्याणासाठी महत्वाच्या ठरल्या जातात. या शब्दांत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.आर.टी.देशमुख यांनी भावना व्यक्त केल्या.



हॉटेल साई पॅलेस येथे कॉ.काशिनाथ कापसे यांच्या पंच्याहत्तरवी अमृत महोत्सवानिमित्त परिवाराने औपचारिक कार्यक्रमाचे आयोजन केले. त्या प्रसंगी देशमुख अध्यक्ष पदावरून बोलत होते. व्यासपीठावर ठाकुर उदयसिंह दिख्खत, जेष्ठ पत्रकार राम कुलकर्णी, ईवाही आण्णासाहेब पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आयुष्यात कधीच वाढदिवस साजरा न करणारे हार तुर्याच्या भानगडीत न पडणार्या कापसेंना प्रथमच लेकराबाळांच्या हट्टामुळे बदल सापेक्ष वास्तव स्विकारावे लागले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन शेकापाचे भाई गुंड यांनी गुरूजींच्या आदर्श जीवनाचा सद्गुण पैलु विशद केला. याचवेळी चळवळीतील अनेक त्यांचे सहकारी ज्यामध्ये अशोकराव देशमुख माकेगावकर, कॉ.नागरगोजे, धसकटे गुरूजी, ठाकुर उदयसिंह दिख्खत, जेष्ठ संपादक अशोक गुंजाळ, डॉ.अनिकेत लोहिया, राम कुलकर्णी आदींनी त्यांच्या जीवन स्वभावातील प्रसंगाला उजाळा दिला. ईवाही म्हणुन भाष्य करताना अशा पाहुण्यांसोबत नातं जमल्याचा आनंद मनस्वी झाल्याचं सांगितलं. माजी प्राचार्य तथा बंधु सोमनाथ आकुसकर म्हणाले की, असा पाठीराखा भाऊ लाभला हे आमचे भाग्य. स्मिता धावडकर यांनी वैयक्तिक गीत म्हटले तर गुरूजींनी अभंगवाणी सादर केली. आपल्या वडिलावर वैशाली, मनिषा, अंजली यांनी आदर्श बाप कसा असतो यावर आधारीत काव्यरचना करून पित्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या. व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सुविद्य पत्नी सौ.सुलोचनाताई यांनी वैवाहिक आयुष्य सुखाचं, आनंदाचं गेल्याचं सांगुन समाज कल्याण, समर्पित आयुष्य गुरूजींचं गेलं याचा खरा आनंद झाल्याचंही त्यांनी सांगितलं. आपल्या भाषणात अध्यक्ष पदावरून बोलताना आर.टी.देशमुख यांनी मोहा तालुका गावात जिथे गुरूजी शिक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांच्या हाताखाली शिकायला मिळाले हे आपले भाग्य असुन माझ्या आयुष्यात त्यांचं येणं हेच भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. धाडस आणि प्रबलता एवढेच नव्हे तर ऊर्जा देण्याचे काम गुरूजी नेहमीच करतात. ग्रामीण भागातील लोकांच्या प्रश्नासाठी त्यांनी उभा केलेल्या चळवळीचा मी साक्षीदार असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना कॉ.काशिनाथ कापसे आयुष्य मागे वळुन पहाताना म्हणाले की, वर्तमान चंगळवादाच्या साधन सामुग्रीची मला कधीच सवय नाही. कै.डॉ.द्वारकादासजी लोहिया यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना तत्कालीन काळात पुरोगामी विचाराने कम्युनिस्ट पताका खांद्यावर घेत ज्यांचा वाली कुणी नाही त्यांची सेवा करण्याचे काम आपण केले. आयुष्यात कधीही कुणाचा द्वेष केला नाही. सर्व राजकिय तथा विविध क्षेत्रातील लोकांच्यासोबत सुसंवाद आणि समन्वय ठेवत चळवळीच्या माध्यमातुन लोकांचे प्रश्न मार्गी लावल्याचा आनंद वाटत असल्याचे ते म्हणाले. खर्या अर्थाने पत्नीचा वाटा असल्याचे मान्य करताना तिच्या खंबीर साथीचं कौतुक त्यांनी केलं. राहुल आणि हेमंत या मुला-मुलींनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यावेळी अंबादास पाटील, जावाई वैभव पाटील, दिनेश हुलगिरी आदी नातेवाईकांसह मित्र परिवार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

## पवित्र रमजान महिन्यात देखील नगरपालिकेकडून मुलभूत सेवा देण्यात कुचराई-शेख अझहर

बीड । प्रतिनिधी

सद्यस्थितीत मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान महिला सुरु आहे यामध्ये मुस्लिम बंधु-भगिनी उन्हाळ्यातदेखील कडक उपवास करतात यामुळे त्यांना पाण्यासह, नादुरुस्त पथदिवे सुरळीत करुन द्यावे तसेच जुना बाजार ते बशीरगंज रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवावे अशा मागणींचे निवेदन शिवसंग्रामचे जिल्हाउपाध्यक्ष शेख अझहर यांनी रमजानचा महिना सुरु होण्यापुर्वीच नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे केली होती परंतू मुख्याधिकारी यांचा वचक कर्मचारी आणि संबंधित यंत्रणावर राहिला आहे का नाही असाच प्रश्न कोणतेही काम न केल्यामुळे उपस्थित होत आहे असे पत्रकाद्वारे शेख अझहर यांनी म्हटले आहे.



पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गत महिन्यापुर्वी बीड नगर परिषदेचे सीईओ यांना प्रत्यक्ष भेटून शहरातील नादुरुस्त पथदिवे आणि पाण्याच्या समस्येबाबत सांगितले. तसेच पुर्वी पाणी ३ घंटे सोडत होते परंतू १५ ते २० दिवसांपासून ते देखील १ तासच सोडत आहेत त्यामुळे मुस्लीम बांधवांचे पवित्र रमजानचे उपवास सुरु असताना तसेच हिंदु बांधवांना देखील पाण्याची उन्हाळ्यामध्ये गरज असतांना नगर परिषदेचे कर्मचारी हे मुख्याधिकारी यांनी सुचना केल्यावर सुद्धा पाणी सोडत नाहीत, नादुरुस्त पथदिवे सुरु करत नाहीत, तुंबलेल्या नाल्या काढत नाहीत, मच्छरांचा फैलाव होवू नये म्हणून धुर फवारणी करत नाहीत त्यामुळे मुख्याधिकारी यांचा नगरपालिका कर्मचार्यावर अंकुश आहे का नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. ८ दिवसाच्या आत दाऊदपुरा, मोमीनपुरा, इस्लामपुरा, मोहंमदीया कॉलनी, दिलावर नगरसह शहरातील पथदिवे आणि पाण्याचा प्रश्न मार्गी न लावल्यास नगर परिषदेच्या दारात उन्हात बसून उपोषण करणार असल्याचे शेख अझहर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## संगीत साधना मंचची संगीत सभा उत्साहात



अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीत साधना मंच अंतर्गत मासिक शास्त्रीय संगीत सभा उत्साहात संपन्न झाली या संगीत सभेचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव जी.बी.व्यास व मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

प्रसिध्द गायक सचिन नेवापूरकर (पुणे) यांच्या शास्त्रीय गायनाने प्रथम मासिक सभा संपन्न झाली. त्यांनी राग यमन ने संगीत सभेची सुरूवात केली त्या नंतर रागेश्री रागातील एक बंदीश सादर करून एक अभंग सादर केला त्यांना तबल्यावर रामकृष्ण करंबेळकर तर संवादिनीवर विश्वजीत धाट यांनी साथसंगत केली महेश भस्मे यांनी संचालन केले. कार्यक्रमासाठी पालक, विद्यार्थी,रसिक उपस्थित होते. संगीत सभेच्या यशस्वितेसाठी रत्नदीप शिगे, प्रफ्फुल दहिवाळ, प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी,प्रार्थना चौभारकर यांनी परीश्रम घेतले.

## विभागीय कुस्तीमध्ये अंतिम विजयाचे मानकरी सुरेश सारूक



नांदुरघाट । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नांदूर घाट सर्कल अंतर्गत असलेले खाडेवाडी येथील वस्ताद सुरेश बाबुराव सारूक यांनी कोल्हारवाडी येथे आयोजित असलेल्या धर्मवीर प्रतिष्ठान कुस्ती स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये अंतिम लढतीमध्ये सुरेश सारूक यांनी अत्यंत चुरशीची लढत देऊन विजय संपादित केला. या मध्ये त्यांना दोन किलो चांदीची गदा व ११ हजार रुपये रोख बक्षीस बाजीराव चव्हाण यांच्याकडून देण्यात आले.

अत्यंत छोट्याशा गावांमधून शेतकऱ्याच्या कुटुंबातून येऊन आपल्या कलेला महत्त्व देऊन कुस्तीचा नाद जोपासत असताना त्यांच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरातून कौतुक होताना दिसत आहे. त्यांचा हा विजय झाल्याबद्दल नांदुर घाट व परिसरातील जनतेच्या वतीने भव्य दिव्य सत्कार करण्यात आला. यावेळी या सत्काराचे आयोजन ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकांतराजे जाधव. प्राध्यापक सतीशजी मोराळे. बाबुराव पाटील. अमोल जाधव. प्रदीप जाधव. दिलीपराव मुंडे. रोहित हंगे. बाळासाहेब जाधव. दत्ता जाधव. अनिल खाडे. महादेव सारूक. संभाजी सारूक. दत्ता खाडे. बाबुराव खाडे. युवराज बोबडे. सुशांत खाडे यांच्यासह नंदिग्राम विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे सर .सर्जेराव खाडे. सर धुमाळ सर व सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी सर्वांच्या वतीने शुभेच्छा देखील देण्यात आल्या.

# घाटनांदूर रेल्वे स्थानकावर जलदगती गाड्यांना थांबा मिळेना

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील रेल्वे स्थानकावर जलदगती रेल्वेड्यांना थांबा देण्यात यावा; अशी मागणी गेल्या पंधरा वर्षांपासून करण्यात येत आहे. वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही या मागणीला यश येत नसल्याने नागरिकांचा लोकप्रतिनिधींवरचा विश्वास उडाला असून प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. खा. प्रितम मुंडे यांनी रेल्वे प्रश्नासंदर्भात घाटनांदूरकरांची केवळ अश्वासनावरच बोळवण केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे येथील तरुणांनी जोपर्यंत जलदगती रेल्वे गाड्यांना थांबा मिळत नाही तोपर्यंत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

खा. प्रितम मुंडे यांनी रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सुनीत शर्मा यांच्याकडे दिल्ली येथे भेट घेऊन याबाबतीत निवेदन सादर केले होते. दीड वर्ष उलटूनही येथील रेल्वेस्थानकावर जलदगतीने धावणाऱ्या रेल्वेगाड्या थांबत नसल्याने; खा. मुंडे यांच्या निवेदनाची रेल्वे बोर्डाने दखल नाही;किंवा त्यांचे प्रयत्न अपुरे पडले आहेत.असेच वाटते कारण आतापर्यंत घाटनांदुर रेल्वे स्थानकावर जलद रेल्वे थांबत नाहीत. घाटनांदूर रेल्वेस्थानक हे प्रवासी आणि व्यापारी दृष्ट्या अतिशय सोयीचे व महत्वाचे स्थानक आहे. या मार्गाहून जाणाऱ्या जलदगती गाड्यांना येथे थांबा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. जलद रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा मिळाला तर, अंबाजोगाई शहारासह घाटनांदूर परिसरातील तीस ते चाळीस खेडे गावातील प्रवासी नागरीक व व्यापाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. तसेच अंबाजोगाईसह परिसरातील माल खरेदीच्या निमित्ताने हैद्राबाद, बैंगलोर आणि मुंबईला जाणाऱ्या व्यावसायिकांसाठी घाटनांदूर रेल्वेस्थानक हे एक मध्यवर्ती रेल्वेस्थानक आहे.




अंबाजोगाई शहर तसेच तालुक्यातील इतर गावांतून तिरुपती येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठीसुद्धा घाटनांदूर रेल्वे स्थानक अधिक सोयीचे आहे. घाटनांदूर येथील रेल्वे स्थानकावर जलदगती गाड्यांना थांबा देण्यात यावा; ही मागणी गेल्या पंधरा वर्षांपासून येथील नागरिकांकडून आमदार आणि खासदारांकडे केली जात आहे.

मात्र लोकप्रतिनिधी वारंवार या क्षुल्लक प्रश्नाकडे दुर्लक्ष करून गावकऱ्यांची थट्टा उडवत आहेत.

पूर्वीच्या नांदेड बँगलोर, औरंगाबाद हैद्राबाद आणि नुकत्याच सुरू झालेल्या नांदेड हुबळी, नांदेड तिरुपती या दोन जलदगती रेल्वेगाड्यांना येथे थांबा नसल्याने तळं उशाला; पण कोरड घशाला अशी प्रवाशांची अवस्था झाली आहे. कोविड-१९ चे कारण देऊन एकमेव नांदेड-बैंगलोर (जलदगती) असलेल्या गाडीचा थांबा सुद्धा एका वर्षातच रद्द करण्यात आला. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. याकडे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी मात्र दुर्लक्ष करत असल्याने प्रवाशी नागरिक हताश झाले आहेत.

### गावातील तरुणांचा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय?

नांदेड-बंगलोर एकमेव जलदगती गाडी येथे थांबत होती; त्यातून महिन्याकाठी लाखों रुपयांचे उत्पन्न रेल्वे खात्याला मिळत असूनही गाडीचा थांबा रद्द का करण्यात आला? लोकप्रतिनिधी यांनी याचे उत्तर जनतेला द्यावे अन्यथा या कुचंबनेची जनता परतफेड केल्याशिवाय राहणार नाही.

**-बालाजी सालपे**

घाटनांदूरच्या रेल्वेप्रश्नासाठी खासदार प्रितम मुंडे यांच्या अश्वासनावर विश्वास ठेवून गेली दहा वर्षे त्यांचे उंबरे झिजवले परंतु यांनी घाटनांदूरकरांना दिलेला शब्द पाळला नाही; यावरून घाटनांदूरकरांना मतदानापुरतं गृहीत धरलं जातं. त्यामुळे आम्ही तरुणांनी मिळून मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

- आशिष पिंपळे

### लाखोंची उलाढाल होणारे रेल्वेस्थानक पडले ओसाड

पूर्वीची पॅसेंजर पण सध्या जलदगतीत रूपांतरित झालेल्या औरंगाबाद- हैद्राबाद तसेच नांदेड बँगलोर जलदगती गाडीचा थांबा रद्द झाल्याने महिन्या अखेर लाख्खो रुपयांचे उत्पन्न देणारे घाटनांदूर रेल्वेस्थानकाचे वैभव लयास जाऊन ते निर्मनुष्य झाल्याचे भयंकर चित्र निर्माण झाले आहे; खा. प्रितम मुंडे यांनी मात्र जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न दुर्लक्ष करत असल्याचे घाटनांदूरकरांना प्रकर्षाने जाणवत आहे. गेल्या दाहवर्षांपासून सामान्य घाटनांदूर करांचा एक प्रश्न सुद्धा खासदार म्हणून सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत याची किंमत मुंडे कुटुंबाला मोजावी लागणार हे मात्र निश्चित आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४६२/२०२४ ॲड. गर्जे एम. आर.**

**अर्जदार : १) सागर सुदर्शन पागोटे, वय-४२ वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, रा. बिंदुसरा कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड, २) अविश सुदर्शन पागोटे, वय-३९ वर्षे, धंदा-नौकरी, रा. रंगारेड्डी तेलंगणा, ३) सुजाता राकेश बिटला, वय-४३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. नल्लकुंठा तेलंगणा**

**विरुध्द गैरअर्जदार निरंक**

**अर्जदार हे भारतीय आहेत**

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत नामे सुदर्शन जानय्या पागोटे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे सुदर्शन जानय्या पागोटे, रा. बिंदुसरा कॉलनी कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड** हे **दिनांक १७/१०/२०२३** रोजी **हैद्राबाद** येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार **क्र.१ व २** हे मयताचे मुले आहेत. अर्जदार **क्र. ३** ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताची पत्नी नामे **उषाराणी सुदर्शन पागोटे** हया **दिनांक १६/१०/२००९** रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक २२/०४/२०२४ **आज दिनांक** /०३/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशावरुन

स्वाक्षरित **क.लि.** | शिक्का | स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# पंकजा मुंडे यांचा केजमध्ये झंझावात; ठिकठिकाणी झाले जल्लोषात स्वागत

## मी केलेला अभूतपूर्व विकास आणि तुमचा कमावलेला विश्वास हाच माझ्या प्रचाराचा मुद्दा ❋ जातीपातीचे राजकारण कधीच केलं नाही ; बुध्दीभेद करणाऱ्यांपासून सावध रहा

**केज । प्रतिनिधी**

पालकमंत्रीपदाच्या काळात केलेल्या कामाची पोचपावती आजही मला मिळते आहे. विकास करताना मी कधीच भेदभाव केला नाही. जात पाहिली नाही, बुथ प्लस आहे का मायनस हे देखील कधी बघितलं नाही.मी जिल्ह्याचा केलेला अभूतपूर्व विकास आणि तुमचा कमवलेला विश्वास हाच या निवडणूकीत माझा प्रचाराचा मुद्दा असेल, त्यामुळं बुद्धीभेद करणाऱ्यांपासून सावध रहा असं आवाहन भाजपच्या उमेदवार तथा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.

पंकजाताई मुंडे आज केजच्या दौर्यावर असून मतदारसंघांतील बुथ कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला, त्यावेळी त्या बोलत होत्या. आजच्या झंझावाती दौऱ्यात पंकजाताईंचं शहरात ठिक ठिकाणी मोठया जल्लोषात स्वागत झालं. आमदार नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, संतोष हंगे, तालुकाध्यक्ष भगवान केदार, विजयकांत मुंडे, वासुदेव नेहरकर, सुनील गलांडे आदी यावेळी उपस्थित होते. धारूर चौकात राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांनी जोरदार स्वागत केले. स्वागताला सभेचं स्वरूप आले. पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या काळात सर्व



जातीधर्माची मोट बांधली होती. आता त्यावेळेस सारखं परकीय आक्रमण नाही पण आज बुध्दीभेद करणाऱ्यांपासून आपल्याला सावध रहायचं आहे. तुमचं विश्व तुमच्या बुथ एवढं तालुक्याएवढं, काहीही झालं तरी तुम्ही तुमची जागा सोडायची नाही.स्वतःवर दिलेली जबाबदारी सोडून दुसर्या ठिकाणी काय चाललयं याकडे लक्ष द्यायचं नाही. मिडीयाने फक्त विरोधातल्या बातम्या लावू नयेत, हे समर्थन पण दाखववां असं त्या म्हणाल्या.



### स्वामी समर्थ, संत तुकाराम महाराजांचे घेतले आशीर्वाद

पंकजाताई मुंडे यांनी सकाळी केज शहरात आल्यावर स्वामी समर्थ मठात जाऊन समर्थांचे दर्शन घेतले. संत तुकाराम बीज निमित्त पावनधाम येथे आयोजित सप्ताहात उपस्थित राहून तुकाराम महाराजांचे आशीर्वाद घेतले.

### जातीपातीच राजकारण कधीच केलं नाही

पालकमंत्री पदाच्या काळात जिल्हयात जी विकासाची कामे केली, त्याची आठवण लोकं आजही गावागावात गेल्यावर काढतात. ताई, तुम्ही हा रस्ता दिला, हे आरोग्य केंद्र दिलं, ही शाळा दिली. अशा कितीतरी कामं लोकं स्वतःहून सांगतात. विकास करताना मी जात-पात पाहिली नाही, बुथ प्लस की मायनस हे सुध्दा कधी बघितलं नाही असं पंकजाताई म्हणाल्या.

### विकास अन् विश्वास हाच प्रचाराचा मुद्दा

मी शिवशक्ती परिक्रमा करून आलेय, माझी शक्ती तुम्हीच अन्? भक्ती देखील तुमच्यावरच आहे. मी जिल्ह्याचा केलेला अभूतपूर्व विकास अन्? तुमचा कमवलेला विश्वास हाच या निवडणूकीत माझा प्रचाराचा मुद्दा आहे. मला दाखवलेल्या काळ्या झेंड्याबद्दल माझा आक्षेप नाही, हे मनोज जरांगेच्या आंदोलनातील संबंधित नाहीत अस मला वाटतं. आपल्याला इतिहासाची पुनरावृत्ती करायचीय.मला आशिर्वाद द्या, तुम्हाला पश्चातापाची वेळ येऊ देणार नाही.मी केलेला विकासचं मला संसदेत घेऊन जाईल, अन यावेळी आपली कहाणी अधुरी राहणार नाही. यावेळी मी दिल्लीवरून सत्कारासाठी येईल तेव्हा मुंडे साहेबांच्या सत्काराची अधुरी कहाणी देखील आपल्याला पूर्ण करायची आहे. आपल्या स्वभावामुळे, चारित्र्यामुळे, वागण्यामुळे आणि आपल्या कामामुळे आपला विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# अमरावतीमधून भाजपकडून नवनीत राणाचे नाव जाहीर

## शिवसेना, बच्चू कडू अन् स्वकीयांचा विरोध डावलून संधी

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने आपली सातवी यादी जाहीर केली आहे. या यादीत महाराष्ट्रातून एकच नाव जाहीर करण्यात आले आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघातून खासदार नवनीत राणा यांना भाजपने अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले आहे. नवनीत राणा या मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यावर अपक्ष निवडणूक लढून जिंकल्या होत्या.

भाजपकडून नवनीत राणा लढणार हे नक्की होते, पण त्यांच्या नावाला शिवसेना शिंदे गटाचा विरोध होता. त्यानंतर भाजपचा अंतर्गत विरोध आणि त्यानंतर बच्चू कडूंनीही नवनीत राणांच्या नावाला विरोध केला होता. महायुतीमधील मित्रपक्षांनी नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला असला तरी देवेंद्र फडणवीस सुरुवातीपासून राणा यांना उमेदवारी देण्याविषयी सकारात्मक होते. गेल्या पाच वर्षांमध्ये नवनीत राणा यांनी संसदेत भाजपला पूरक भूमिका घेतल्याचे फडणवीस यांनी



सांगितले होते. त्यामुळे नवनीत राणा यांना भाजपची उमेदवारी मिळणार, हे जवळपास निश्चित होते. परंतु, मित्रपक्षांचा विरोध आणि जातप्रमाणपत्राचा अडथळा नवनीत राणांच्या उमेदवारीत खोडा घालणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. मात्र, या सगळ्या शंका-कुशंका दूर सारत भाजपने नवनीत राणा यांना अमरावती लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देऊ केली आहे. आता येथून निवडून येणे, नवनीत राणा यांच्यासाठी खरे आव्हान असणार आहे.



# फुलचंदराव कराड यांचा शरद पवार गटात प्रवेश

**परळी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यांनी खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. हा जाहीर प्रवेश सोहळा मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयामध्ये संपन्न झाला आहे.

भारतीय जनता पार्टीला सोडचिट्टी देत राष्ट्रवादी

### कमळ चिन्हाला सोडचिट्टी देत फुलचंद कराड यांनी घेतली हातात तुतारी

काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटात या शरद पवार साहेबांच्या हस्ते मुंबई येथे प्रवेश केला आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब, खा. नरेंद्रजी पाटील, आ. जितेंद्र आव्हाड, आ. राजेशजी टोपे यांची उपस्थिती होती.

# हातकणंगलेची जागा रयत क्रांती संघटनेला द्या - सदाभाऊ खोत

**इस्लामपूर । प्रतिनिधी**

सन २०१९ च्या निवडणुकीपासून आम्ही हातकणंगले मतदारसंघ रयत क्रांती संघटनेला मागत आहोत. मात्र राजकारणात प्रस्थापितांनाच प्राधान्य दिले जात असल्याने आमच्यासारखे विस्थापित दुर्लक्षीतच राहात आहेत, अशी खंत रयतक्रांती संघटनेचे संस्थापक, माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी येथे माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. हातकणंगलेच्या जागेसंदर्भात पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सदाभाऊ खोत म्हणाले, सुरवातीपासूनच प्रस्तापितांच्या विरोधात आमची लढाई सुरु आहे. आम्ही नेहमी विस्तापितांच्या बाजूनेच राहिलो आहे. मात्र



राजकारणात प्रस्तापित घराणीच आमच्या मानगूटीवर बसत आहेत. त्यामुळे भविष्यात विस्तापित विरुद्ध प्रस्तापित लढाई अधिक तीव्र करणार आहोत. आम्ही महायुतीकडे हातकणंगलेची जागा रयत क्रांती संघटनेला मिळावी अशी मागणी केली होती. मात्र दुर्दैवाने या मागणीचा विचार होताना दिसत नाही. ते म्हणाले, सन २०१९ च्या निवडणुकीतही आम्ही निवडणूक लढविण्याची सर्व तयारी केली होती. मात्र जागा वाटपात ही जागा शिवसेनेला गेली. आम्हाला थांबण्याचा सल्ला देण्यात आला. युतीचा धर्म पाळून आम्ही माघार घेतली. प्रचारप्रमुखाची भुमिका बजावून महायुतीचा उमेदवार निवडून आणला. त्यानंतर राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आली. आम्ही पुन्हा रस्त्यावरची लढाई लढत सामान्य जनतेशी नाळ कायम ठेवली. आता या निवडणुकीत तरी हातकणंगलेची जागा आम्हाला मिळावी अशी मागणी आम्ही महायुतीकडे केली होती. मात्र पुन्हा आम्हाला डावलण्यात येत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे आम्ही आता प्रस्तापितांचा प्रचार करणार करणार नाही. कार्यकर्त्यांची बैठक घेवून पुढील भुमिका निश्चीत करु. तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटून या जागेसंदर्भात चर्चा करू असे ते म्हणाले.

# वेळ पडल्यास कोणत्याही लढाईसाठी तयार -विश्वजीत कदम

**सांगली । प्रतिनिधी**

सांगली लोकसभेच्या जागेवरुन महाविकास आघाडीत निर्माण झालेला तिढा अद्याप सुटलेला नाही. ठाकरे गटाकडून बुधवारी प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवार यादीत सांगलीतून चंद्रहार पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. परंतु, काँग्रेस पक्ष सांगलीची जागा ठाकरे गटासाठी सोडायला तयार नाही. त्यासाठी काँग्रेस नेते विश्वजीत कदम आणि इच्छूक उमेदवार विशाल पाटील यांनी बुधवारी थेट दिल्लीत जाऊन पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांची भेट घेतली. यावेळी विश्वजीत कदम यांनी आक्रमक भूमिका घेत सांगलीची जागा काँग्रेसचीच आहे, असे ठणकावून सांगितले.

गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसचे विशाल पाटील हे सांगलीतून लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी तयारी करत होते. सांगलीचा पुढचा खासदार विशाल पाटील हेच असतील, अशी खात्रीही अनेकांना होती. मात्र उद्धव ठाकरे यांनी सांगलीच्या जागेसाठी परस्पर चंद्रहार पाटील यांच्या नावाची घोषणा केली होती. बुधवारी ठाकरे गटाने प्रसिद्ध केलेल्या उमेदवार यादीत सांगलीच्या जागेसाठी चंद्रहार पाटील यांचेच नाव होते. परंतु, काँग्रेस पक्ष ही जागा सोडायला तयार नाही. उद्धव ठाकरे यांनी चंद्रहार पाटील यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर काँग्रेसचे प्रमुख नेते नाराज झाले होते. त्यांच्या या नाराजीला न जुमानता ठाकरे गटाच्या उमेदवारी यादीतही सांगलीसाठी चंद्रहार पाटील यांनाच उमेदवारी दिल्याने हा वाद चिघळला आहे.

# 'एकत्रित या' प्रकाश आंबेडकर यांना जितेंद्र आव्हाड यांची विनंती

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने केंद्रीय संसदीय कार्यकारी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या बैठक होणार आहे. त्यानंतर उमेदवारांची यादी जाहीर होईल असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, प्रकाश आंबेडकर यांना हात जोडून विनंती आहे की, तुम्ही आंबेडकरी विचारांचे पुसस्कर्ते आहात, तुमचे आंबेडकरी विचारांशी रक्ताचे



नाते आहे आणि आमचे विचारांचे नाते आहे. त्यामुळे रक्त आणि विचार एकत्र आले की आपण कोणालाही थोपवू शकतो. त्यामुळे त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा विचार करावा.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, तर मी माझी भूमिका मांडली आहे. त्यांना कळत की कळत नाही. हे मी नाही सांगणार. कारण ते माझ्यापेक्षा फार मोठे आहेत. ते वकील आहेत. त्यांच्या अंगात आंबेडकरांचे रक्त आहे. त्यामुळे त्यांच्याविषयी काहीही बोलणे योग्य ठरणार नाही. पण शत्रूच्या विचाराशी लढताना एक पाऊल मागे घ्यावे लागते. त्यामुळे आंबेडकरांनी न रागवता याबाबतचा विचार कराव, असे म्हणत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रकाश आंबेडकर यांना हात जोडून विनंती केली. तसेच, जागावाटपाबाबत जे काही तिढे आहेत, ते सर्व तिढे सुटले जातील, असे यावेळी स्पष्ट केले.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सुनील तटकरे हे अजित पवार यांना अडचणीत आणत आहेत त्यांना सुप्रीम कोर्टाच्या अवमानाबद्दल माहीत नाही. कोर्टाच्या ऑर्डर मध्ये स्पष्टपणे लिहिण्यात आलं आहे की घड्याळ हे चिन्ह आत्ता न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे तुम्ही याचा वापर करताना त्याच्या खाली ही गोष्ट न्याय प्रविष्ट आहे अस लिहिणं बंधनकारक आहे. महाराष्ट्रातील जनता मूर्ख आहे का? असं तटकरे यांना वाटतं आहे का? असा सवालही यावेळी उपस्थित केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने देशमुख व सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष मदनसिंह जाधव यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी खा.निवास पाटील, राष्ट्रीय सरचिटणीस नसीम सिद्दीकी, अभिजीत पाटील, विद्या लोळगे, व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागपुरात भाजपचे शक्तिप्रदर्शन : गडकरी, पारवे यांचे उमेदवारी अर्ज दाखल

नागपूर । प्रतिनिधी

नागपूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि रामटेक लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांनी बुधवारी (दि.२७) नामांकन दाखल केले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते खा प्रफुल्ल पटेल, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती होती.

सुरुवातीला संविधान चौकात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला नितीन गडकरी यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले. संविधान चौकात 'कहो दिल से नितीनजी फिर से', अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा आदी क्षेत्रांमधील संघटनांनी नितीन गडकरी यांचे ठिकठिकाणी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी



जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचण्यापूर्वी आकाशवाणी चौकात सभा झाली. या सभेने कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह संचारला. महिलांनी फुगडी खेळून तर युवकांनी गाण्यांच्या तालावर ठेका धरून आनंद व्यक्त केला. या सभेला रामटेकचे शिवसेना खासदार कृपाल तुमाने, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी राज्यमंत्री श्रीमती सुलेखाताई कुंभारे, आमदार आशीष जयस्वाल, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, भाजपचे ज्येष्ठ नेते संजय भेंडे आदींची उपस्थिती होती. खा.प्रफुल्ल पटेल यांनी नितीन गडकरी हे नागपूरचे नव्हे तर देशाचे वैभव असल्याचे गौरवोद्गार काढले. दरम्यान, यंदा नितीनजी रेकॉर्डब्रेक मते मिळवून विक्रम प्रस्थापित करतील. असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, 'नितीनजींनी गेल्या दहा वर्षांमध्ये जे काम केले आहे, तो केवळ ट्रेलर आहे. पुढील पाच वर्षांत महाराष्ट्र आणि देश आणखी बदललेला असेल.' या निवडणुकीत विरोधकांचे बारा वाजविल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

### लाखांचे मताधिक्य द्या- नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी माझे कार्यकर्तेच मला लढण्याची ऊर्जा देतात,गेल्या दहा वर्षांमध्ये १ लाख कोटी रुपयांची कामे नागपूर लोकसभा मतदारसंघात झालीत. पण या कामांचे श्रेय माझे किंवा देवेंद्रजींचे नसून हजारो कार्यकर्त्यांचे आहे. निवडणुकीत विजय निश्चित आहे.७५ टक्के मतदानासह ५ लाख मतांनी मला निवडून द्या अशी विनंती केली.

# डॉ.ज्योती मेटे यांच्या जिल्ह्यात गाठी-भेटी विविध कार्यक्रम, बैठकांवर भर

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषगाने डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांचे नाव चर्चीले जात आहे. यात ज्योती मेटे यांनी काल कार्यकर्त्यांशी संवाद साधत कसल्याही अफवांना बळी पडू नका आपण लोकसभा निवडणूक लढणारच आहोत कामाला लगा असा संदेश दिला त्यामुळे कार्यकर्त्याचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. यासोबतच डॉ.ज्योती मेटे यांनी गाठी - भेटी , विविध कार्यक्रम, बैठकांवर भर देत जिल्ह्यात संवाद सुरू केला आहे. यात सर्वसामान्य



जनतेचा त्यांना चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे .

डॉ.ज्योती मेटे यांनी निवडणूक लढणार ही घोषणा करताच जिल्ह्यात आष्टी , बीड , केज, माजलगाव तालुक्यात आपल्या बैठका, गाठी - भेटी वाढवल्या आहेत. यात त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असून त्यांनी निवडणुकीच्या संदर्भाने बांधणी सुरू केली आहे. दुसरीकडे डॉ.ज्योती मेटे यांच्या घोषणेनंतर जिल्हावासियांमध्ये आता सक्षम उमेदवार मिळाल्याची चर्चा देखील होत आहे. कालच डॉ. ज्योती मेटे यांनी आपण शासकीय सेवेचा राजीनामा दिला असून तो मंजूर झाला आहे अशीही घोषणही केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सिंहगडाच्या जंगलात वणव्यांची मालिका सुरुच

## वणवे लावणाऱ्या समाजकंटकांची माहिती देणाऱ्यास पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर

**वेल्हे । प्रतिनिधी**

सदाहरित वनराई, घनदाट झाडी व झुडपांचे वरदान लाभलेल्या सिंहगड किल्ल्याच्या सभोवतालच्या जंगलांत वणव्यांची मालिका सुरूच आहे. वणवे लावणार्या समाजकंटकांची माहिती देणार्यास वन विभागाने पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. सिंहगड किल्ला परिसरातील जंगलांना दररोज वणवे लावले जात आहेत. वणवे आटोक्यात आणण्यासाठी वन कर्मचार्यांसह सुरक्षारक्षकांना पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत जीव धोक्यात घालून धावपळ करावी लागत आहे. सोमवारी (दि. २५) एकाच वेळी दुरुपदरा, चांदेवाडी, घेरा सिंहगड अशा तीन ठिकाणच्या जंगलांत भीषण वणवे लागले होते.



सिंहगड वन विभागाचे वन परिमंडलाधिकारी समाधान पाटील यांनी सुरक्षारक्षकांसह वणवे रोखण्यासाठी धाव घेतली. दोन-अडीच तासांत वणवे रोखण्यात यश मिळाले. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात जंगल जळून भस्मसात झाले होते. जंगलांना वणवे लावणार्या समाजकंटकांचा बंदोबस्त करण्यासाठी पुणे (भांबुर्डा) वन विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी प्रदीप संकपाळ यांच्या देखरेखीखाली वन विभागाने वन अधिनियम कायद्यांतर्गत उपाययोजना सुरू केल्या आहेत. वणवे लावणार्या समाजकंटकांची माहिती हॅलो फॉरेस्टच्या हेल्पलाइन क्रमांक १९२६ वर देणार्यास पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे, तसेच माहिती देणार्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे वन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

सिंहगड परिसरातील डोणजे, अतकरवाडी, खानापूर, मणेरवाडी, घेरा सिंहगडसह पानशेतपर्यंतच्या जंगलातील वनसंपदा मोठ्या प्रमाणात वणव्यात भस्मसात झाली आहे. कडक उन्हाळा व जोरदार वार्यामुळे वणवे भडकून एकापाठोपाठ एक जंगल खाक होत आहेत. जंगलाच्या सभोवताली जाळरेषा काढूनही समाजकंटक जंगलाच्या मध्यभागी आग लावून पसार होत आहेत. त्यामुळे वन विभाग हतबल झाला आहे. वनसंपदेचे रक्षण करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी सहकार्य करावे. महॅलो फॉरेस्टफ हेल्पलाइनवर माहिती द्यावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

# कलाकृतीला आधुनिकतेची जोड हवी- शिल्पकार रामपूरे

**आकुर्डी । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ते मुळे हाताने रेखाटली जाणारी कला मागे पडत चालली आहे. तरीही हताश न होता यश प्राप्तीसाठी कष्ट केलेच पाहिजेत. तंत्रज्ञान प्रगत झाले तरी कष्टाशिवाय पर्याय नाही. कला हि रियाज असते.पारंपरिक कलाकृतीला आधुनिकतेची जोड दिली पाहीजेत.असे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार भगवान रामपूरे यांनी व्यक्त केले.

आकुर्डी येथील डॉ डी वाय पाटील कॉलेज ऑफ़ अप्लाईड आर्ट ड क्राफ्ट्सच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य चित्र प्रदर्शनाच्या सांगता प्रसंगी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

आठवडाभर भरवण्यात आलेल्या या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी साकारलेल्या चित्र कलादालनात चारशेहून अधिक विद्यार्थ्यांच्या कलाकृतीचा समावेश होता.



डी वाय पाटील अप्लाईड आर्ट्स कॉलेजमध्ये कला प्रदर्शन

श्री. रामपुरे यांनी ९० च्या दशकात साकारलेल्या बजाज जाहिरातीमधील चित्त्याची संकल्पना करताना व मुंबईस्थित शेयर मार्केटच्या वास्तु समोरील वळूची मूर्ती साकारल्यानंतर मिळालेल्या यशाचे रंजक कथन केले. माजी प्राचार्य मारुती पाटील म्हणाले कि, २० वर्षांपूर्वी १३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाने सुरू झालेल्या रोपाचे वटवृक्ष झाला. अशा शब्दात जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी शैक्षणिक संकुलाचे वित्तीय अधिकारी बिपिनबिहारी शर्मा म्हणाले कि, कलेचे प्रत्येक क्षेत्रात महत्त्व वाढत असून रंगाशिवाय सृष्टी अर्थहीन होईल. असे मत त्यांनी व्यक्त केले.समाज व विद्यार्थ्यांच्या हितार्थ महाविद्यालयाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती देताना प्राचार्य जयप्रकाश कलवले यांनी विश्वस्त तेजस पाटील व शैक्षणिक संकुलाचे संचालक रियर ऍडमिरल अमित विक्रम,वित्तीय अधिकारी बिपिन शर्मा यांच्या भक्कम पाठिंब्याचा उल्लेख करून अध्यापक समुहाच्या कार्यकुशलतेचे कौतुक केले. यावेळी चारी वर्गाच्या अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयासाठी ३ बक्षीसे याप्रमाणे १२० पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा बहूमान कांचन चौसाळकर हिला प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. नितीन तावरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. राहूल वेलदोडे यांनी केले. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रा. शंकर आडेराव, प्रा. शरद वडकर, प्रा. पल्लवी पांढरे, प्रा. विवेक मगर, प्रा. समता बेंद्रे, प्रा. सुरभी गुळवेलकर , प्रा. इंद्रजित बंगाळे, प्रा. कृष्णा सावंत, प्रा. श्याम पगारे, प्रा. राजेश पुजारी, प्रा. विजयलक्ष्मी पिंजल, प्रा. प्रियंका खुंजिर, महादेव जगदाळे, अमेंद्र देशमुख, अमोल हरगुडे, जगन्नाथ चौघुले, दर्शना गायकवाड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# पाण्याअभावी पिके जळू लागली पोटचाऱ्यांना पाणी सोडण्याची मागणी

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्याच्या पूर्व भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण झालेली आहे. येथील बहुतांश शेती ही पोटचार्यांच्या आधारावर आहे. त्यामुळे खडकवासला धरण कालव्याचे उन्हाळी आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी शेतकर्यांनी केली आहे.

राजेगाव, मलठण, बोरीबेल, स्वामी चिंचोली, तवेगाव, गाडेवाडी, काळेवाडी, खडकी, रावणगाव, नंदादेवी या भागात असलेल्या पाणीटंचाईमुळे नागरिकांचे प्रचंड हाल सुरू आहेत. काही ठिकाणची हातातोंडाशी काढणीला आलेली पिके जळून जाण्याच्या मार्गावर आहेत. पिकांना आता पाण्याची गरज आहे. जर पिकांना वेळेत पाणी मिळाले नाही तर येथील शेतकर्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



या भागातील चार्यांना खडकवासला धरण कालव्याच्या मुळा-मुठा कालव्यातून पाणीपुरवठा केला जातो. सध्या कांदा, ऊस, मका व काही फळबागादेखील या पोटचार्यांच्या पाण्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे या भागातील पोटचार्यांना लवकरात लवकर पाणी सोडावे, अशी येथील शेतकर्यांनी मागणी केली आहे. उन्हाळी आवर्तन वेळेत आले तर येथील पाण्याचा प्रश्न मिटेल. चारीला पाणी कधी येईल याचीच सर्व शेतकरी प्रतीक्षा करत आहेत. १० ते १२ दिवसांत मुख्य चारी असलेल्या बीबीसी तसेच ३२ आणि ३५ फाट्याला पाणी सोडण्यात येणार आहे, अशी माहिती खडकवासला जलसंपदा विभागाचे उपकार्यकारी अभियंता शंकर बनकर यांनी दिली. तर आमदार राहुल कुल यांच्या प्रयत्नामुळे उन्हाळी दोन आवर्तने सोडण्यात येणार असल्याचे स्वामी चिंचोलीचे माजी सरपंच अझहरुद्दीन शेख यांनी सांगितले.

# जप्त वाहनांच्या ई-लिलावाद्वारे एकाच दिवशी सुमारे ३९ लाख रुपये महसूल जमा

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाद्वारे मोटार वाहन कर न भरलेल्या व मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्ह्याअंतर्गत अटकावून ठेवलेल्या ११ वाहनांचा ६ मार्च रोजी ई-लिलाव करण्यात आला असून त्यामध्ये ३८ लाख ९० हजार रुपयांचा महसूल जमा झाला आहे.

कर न भरलेली व गुन्ह्यात अटकावून ठेवलेली १३ वाहने ई- लिलावासाठी उपलब्ध होती. यात बस, एचजीव्ही, एलजीव्ही, डी व्हॅन, टुरिस्ट टॅक्सी, एक्सकॅव्हेटर आदी वाहनांचा समावेश आहे. या वाहनांच्या मालकांनी वेळोवेळी संधी देऊनही थकीत कर भरणा केला नसल्याने या वाहनांचा www.eauction.gov.in या शासकीय संकेतस्थळावर ई- लिलाव ठेवण्यात आला. त्यापैकी ११ वाहनांना ऑनलाईन बोली प्राप्त झाली व त्यानुसार महसूल प्राप्त झाला आहे. पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाने २०२१ ते मार्च २०२४ या कालावधीत जाहीर ई-लिलावाद्वारे १ कोटी ४८ लाख रुपयांचा शासकीय महसूल वसूल करण्याची कार्यवाही केली आहे. थकीत मोटार वाहन कर वसुलीकरीता यापुढेही ई-लिलाव केले जातील याची नोंद घेऊन थकीत मोटार वाहन कर भरावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी केले आहे.

# देहूमध्ये तुकाराम बीज सोहळ्यानिमित्त भाविकांची अलोट गर्दी

**पुणे । प्रतिनिधी**

भाविकांच्या अभंगगजरात बुधवारी देहूनगरी दुमदुमली. भजनी दिंड्यांनी रात्रभर केलेला जागर, काकडआरती, महापूजा, हरिपाठ अन् वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ अशा भक्तिमय वातावरणात बीज सोहळ्याला अलोट गर्दी झाली आहे. संत तुकाराम महाराजांच्या ३७६ व्या बीज सोहळ्यासाठी लाखो भाविक देहूमध्ये दाखल झाले आहेत.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे आजच्या दिवशी सदेह वैकुंठ गमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचे बीज सोहळ्याचे ३७६ वर्षे आहे. देहूनगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले. पहाटे तीन वाजता मुख्य देऊळवाड्यात काकड




आरती झाली. पहाटे चार वाजता संस्थानचे विश्वस्त, अध्यक्ष मंडळ, वंशज, वारकरी यांच्या हस्ते श्री पूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात महापूजा झाली. पहाटे साडेचार वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पूजा झाली. पहाटे सहा वाजता वैकुंठगमन स्थान येथील संत तुकाराम महाराज मंदिरात महापूजा झाली. सकाळी साडेदहा वाजता पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले. त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात देहूकर महाराजांचे कीर्तन झाले. दुपारी बारापर्यंत तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. दुपारी साडेबारा वाजता वैकुंठस्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यातील मंदिराकडे आगमन झाले.

# रांजे येथील रंगाच्या कंपनीला भीषण आग : लाखो रुपयांचे नुकसान

**भोर । प्रतिनिधी**

शिवापूर ते कोंढणपूर यादरम्यान असलेल्या रांजे (ता. भोर) येथील टप कोट या रंगाच्या कंपनीला बुधवारी (दि. २७) आग लागली असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी समजते आहे. त्याचप्रमाणे सभोवताली असलेल्या कंपन्या देखील या आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या आहेत. रांझे (ता. भोर) ग्रामपंचायतीच्या हद्दीत टपकोट नावाची रंग तयार करण्याची कंपनी आहे. त्या कंपनीला बुधवारी साधारण साडे दहा वाजण्याच्या सुमारास आग लागली. रंगाची कंपनी असल्यामुळे केमिकल व इतर ज्वलनशील पदार्थ कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात होते.



त्यामुळे आगीने रौद्र रूप धारण केले, त्याचप्रमाणे या आगीमुळे त्याच्या शेजारील असलेल्या कंपनींना देखील आग लागली आहे. घटनास्थळावर ग्रामसेवक भूषण पुरोहित यांच्यासह राजगड पोलीस दाखल झाले असून अजूनही आगीचे बंब दाखल झाले नसल्याने आगीने शेजारील दोन कंपन्या आपल्या कवेत घेतल्या आहेत.

याबाबत भोरचे तहसीलदार सचिन पाटील यांना संपर्क साधला असता त्यांनी तातडीने पाण्याचे बंब लागतील तेवढे त्वरित पाठवण्याचे आदेश संबंधित प्रशासनाला दिले आहे. कंपनीच्या शेजारी असलेल्या चितळे बंधू कंपनीच्या इंद्रनील चितळे यांनी सांगितले की, मी स्वतः फायर ब्रिगेडशी संपर्क साधला आहे. त्याचप्रमाणे आम्हीही जे काही सहकार्य असेल ते करू, असे सांगितले.

यापूर्वी भागात आग लागण्याच्या घटना घडल्या होत्या, त्यावेळी राजगड पोलिसांनी कंपनी चालकांची बैठक घेऊन सर्वात मिळून एक आगीचा बंब खरेदी करावा असा सल्ला किंबहुना आदेश दिला होता; मात्र त्याकडे सर्वच कंपनी चालकांनी दुर्लक्ष केले असल्याचे या घटनेवरून स्पष्ट झाले आहे.

# फरार तस्कराला बेड्या; गुन्हे शाखेची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

मेफेड्रॉन ड्रगतस्करी प्रकरणात गुन्हे शाखेच्या हाती बडा तस्कर लागला आहे. तो आईला भेटण्यासाठी आल्याचे समाजात पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्याच्याकडून १० लाख रुपयांचे ५१ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले आहे. मागील महिनाभरापासून संबंधित आरोपी पसार झाला होता. याप्रकरणी पुणे गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला बेड्या ठोकल्या आहेत. शोएब सईद शेख (रा. कोंढवा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.



शहरातील मध्य भागात मेफेड्रॉन तस्करी करणार्या सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखेने १९ फेब- वारीला अटक केली होती. याप्रकरणी पोलिसांनी यापूर्वी १३ जणांना अटक केली. मेफेड्रॉन मास्टर माइंड संदीप धुनिया, अशोक मंडल, वीरेंद्रसिंग बसोया हे फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे. ही कामगिरी अपर आयुक्त शैलेश बलकवडे, पोलिस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक पोलिस आयुक्त सतीश गोवेकर, सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.मेफेड्रोन तस्कर शोएब शेख आईला भेटण्यासाठी आल्याची माहिती पुणे गुन्हे शाखेला मिळाली . त्यानुसार त्याला गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. गेल्या एक महिन्यापासून तो जळगाव, पंढरपूर, शिर्डी या ठिकाणी फिरत असल्याचे उघडकीस आले आहे. दरम्यान, तो हैदर शेख याच्यासोबत माल पुरविणे, मेफेड्रोन गोडाऊनमध्ये ठेवणे, तेथून पुढे पाठविणे, असे काम करीत होता

# शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर; मावळमधून ठाकरे गटाची संजोग वाघेरे यांना उमेदवारी

**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर; मावळमधून ठाकरे गटाची संजोग वाघेरे यांना उमेदवारी शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून अखेर आज आपल्या लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे, यामध्ये १७ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी ही यादी ट्विटरवर पोस्ट केली आहे.

'हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्ष प्रमुख श्री.उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेनेच्या १७ लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येत आहे.. .मुंबई दक्षिण मध्य: अनिल देसाई यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात येत आहे. इतर १६ उमेदवार पुढील प्रमाणे बुलढाणा नरेंद्र खेडेकर, यवतमाळ, वाशिम संजय देशमुख, मावळ संजोग वाघेरे, सांगली चंद्रहार पाटील, हिंगोली नागेश पाटील आष्टीकर, छत्रपती संभाजीनगर चंद्रकांत खैरे, धाराशिव ओमराजे निंबाळकर, शिर्डी भाऊसाहेब वाघचौरे, नाशिक राजाभाऊ वाजे, रायगड अनंत गिते, सिंधुदुर्ग, रत्नागिरी विनायक राऊत, ठाणे राजन विचारे, मुंबई ईशान्य संजय दिना पाटील, मुंबई दक्षिण अरविंद सावंत, मुंबई वायव्य अमोल किर्तीकर, परभणी संजय जाधव' असं ट्विट संजय राऊत यांनी केलं आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून अद्यापही चार ते पाच जागांवरील उमेदवारांची घोषणा होणे बाकी आहे. वंचितच्या भूमिकेनंतर या चार ते पाच जागांवरील निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती सूत्रांच्यावतीने मिळत आहे

# पिंपरी-चिंचवड पोलिसांना नाकाबंदीमध्ये आढळली तब्बल ५० लाखाची रोकड

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलिसांना नाकाबंदी दरम्यान मुंबई पुणे द्रुतगती मार्ग येथी उर्से टोल नाका येथे एका कार मध्ये ५० लाख रुपयांची रोकड आढळून आली आहे. संबंधित व्यक्तीकडे चौकशी केली असता त्याला या रकमेबाबत योग्य माहिती देता आली नसल्याने रोकड जप्त करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी पोलिसांकडून चौकशी केली जात आहे.

पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलिसांनी हद्दीमध्ये नऊ ठिकाणी नाकाबंदी लावली आहे. पुणे मुंबई द्रुतगती मार्गावर उर्से टोलनाका येथे देखील नाकाबंदी करण्यात आली आहे. मंगळवारी (दि. २६) उर्से टोलनाका येथे शिरगाव पोलीस वाहनांची तपासणी करत असताना त्यांना एका स्कॉर्पिओ मध्ये ५० लाख रुपये रोख रक्कम मिळाली .

पोलिसांनी संबंधित चालकाकडे रकमेबाबत खुलासा मागितला. मात्र त्यास योग्य खुलासा करता आला नाही. त्यामुळे पोलिसांनी ती रक्कम जप्त केली आहे. या प्रकरणाची पोलिसांकडून चौकशी केली जात असल्याचेही पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी सांगितले.

# क्वीन्स टाऊन सोसायटीतर्फे कॉर्फबॉल स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा सन्मान

## स्निग्धा सातव आणि कृष्णा सातव क्वीन्स टाऊन सोसायटीचे रहिवाशी

**पिंपरी । प्रतिनिधी**

आग्रा येथे संपन्न झालेल्या १९ व्या राष्ट्रीय सब ज्युनियर कॉर्फबॉल स्पर्धेत विजेतेपद मिळवल्याबद्दल चिंचवड येथील क्वीन्स टाऊन सोसायटीच्या वतीने संघातील सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यशस्वी संघातील रिया बोरा ( कर्णधार), युविका कोल्हे, अन्विता बोरसे, स्निग्धा सातव, प्राची संघवी, मुले- कृष्णा सातव, आर्यण शिंगटे, प्रद्युम्न नायर,आरिझ दानवडे या खेळाडूंचा सत्कारामध्ये समावेश आहे.

यावेळी सोसायटीचे अध्यक्ष सुजित पाटील, सचिव बबन भोसले, सुरेश गारगोटे,ज्येष्ठ दंतवैद्य डॉ.माऊली फरांदे, माजी नगरसेविका भारती फरांदे,ड कुंडलिक गावडे, ड सोपान माने, उद्योजक भास्कर गावडे, प्रदीप




स्निग्धा सातव हिचा सत्कार करताना डावीकडून सुजित पाटील, बाबा पाटील, मल्लीनाथ कलशेट्टी, सचिव भोसले, ड सोपान माने, डॉ माऊली फरांदे,रमेश सातव सौ मोहिनी सातव आदी २) कृष्णा सातव या खेळाडुचा सत्कार करताना सुजीत पाटील, भोसले, आदी मान्यवर

दिवटे, बाबासाहेब माने, मल्लिनाथ कलशेट्टी, कार्यक्रमाचे समन्वयक रमेश सातव,प्रशिक्षक सचिन ववले,अविनाश अहिरशिंगे आणि सोसायटीतील सर्व संचालक मंडळ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

यावेळी क्रीडा मानसिकता विषयक (लंडन) पदवीप्राप्त अदिती गारगोटे म्हणाली कि,खेळाडूंनी खेळताना आपलं डोकं शांत ठेवून खेळाकडे अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

सदरील खेळाडू शिकत असलेल्या सेंट ऊर्सूला हायस्कूलच्या प्राचार्या सिस्टर ग्रेसी यांनी अभिनंदन केले. यावेळी डॉ फरांदे यांनी शुभेच्छा दिल्या. सोसायटीचे सुजित पाटील यांनी त्यांच्या मनोगतांमध्ये सोसायटीची क्लब हाऊस आणि सोसायटीमधील मुलांना खेळाच्या बाबतीमध्ये जे जे काही सहकार्य सोसायटीच्या वतीने शक्य ते सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सोसायटीतून दरवर्षी असे नवनवीन खेळाडू घडावेत. अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश गारगोटे यांनी केले. आभार प्रदर्शन उद्योजक रमेश सातव यांनी मानले.

# रक्त अदलाबदली प्रकरण:अखेर 'त्या' दोन परिचारिका निलंबित




**पुणे । प्रतिनिधी**

औंध जिल्हा रुग्णालयात परिचारिकांच्या निष्काळजीपणामुळे रक्ताची अदलाबदल झाली आणि एकच खळबळ उडाली. संबंधित प्रकरणाची मंगळवारी (दि.२६) गांभीर्याने दखल घेण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले यांनी दोन्ही अधिपरिचारिकांना निलंबित केले. प्रीती ठोकळ आणि शांता मकलूर अशी त्यांची नावे आहेत. न्यूमोनिया झाल्याने रुग्ण दत्तू सोनाजी सोनवणे जिल्हा रुग्णालयात दाखल झाले. त्याचवेळी त्यांच्या बाजूच्या बेडवर दगडू कांबळे दाखल झाले. ज्येष्ठ नागरिक असलेल्या दोन्ही रुग्णांना रक्त देण्याच्या सूचना डॉक्टरांनी दिल्या. त्यानुसार दोन्ही रुग्णांच्या नावाच्या रक्तपिशव्या वॉर्डमध्ये पाठविण्यात आल्या. मात्र, परिचारिकांच्या निष्काळजीपणामुळे रक्तपिशव्यांची अदलाबदली झाली. रुग्णांना काही काळाने त्रास सुरू झाला. त्यामुळे नातेवाइकांनी तक्रार केल्यावर संबंधित प्रकार लक्षात आला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. यमपल्ले यांनी चौकशी करून अहवाल मागविला. संपूर्ण अहवाल पाहिल्यानंतर मंगळवारी (दि. २६ मार्च) दोन अधिपरिचारिकांना तडकाफडकी निलंबित केले. सध्या दोन्ही रुग्णांची परिस्थिती स्थिर असल्याचे समजते.